# छात्र प्रबोधन

सौर अश्विन शके १९२२
वर्ष १ अंक १



**ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक !**

# छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक २००० !

## छात्र प्रबोधनच्या वाटचालीतील.... शंभरावा अंक !

### यावर्षीच्या दिवाळी अंकाची वैशिष्ट्ये

- स्वत:च्या क्षेत्रात **विशेष कर्तृत्व गाजविलेल्या,** काही स्वप्ने उराशी बाळगून त्या दिशेने वाटचाल करत असलेल्या ३५ ते ५० या वयोगटातील विविध क्षेत्रांमधल्या **१० व्यक्तींचे प्रेरणादायी अनुभव,** त्यांच्याच शब्दांमध्ये !
- जयंत नारळीकर, शाम भुर्के, निनाद बेडेकर, मुकुंद जोगळेकर, विजय देवधर, शकुंतला फडणीस, लीला दीक्षित, सुरेशचंद्र वारघडे इ. मान्यवरांच्या **विज्ञान, साहस, ऐतिहासिक, विनोदी कथांचा खजिना** !
- रवीन्द्र भट, फ.मु.शिंदे, किशोर पाठक, इंद्रजित भालेराव, दत्ता हलसगीकर, वि.म.कुलकर्णी, संगीता बर्वे, कल्याण इनामदार इ. **मान्यवर कवींच्या कवितांचा बहर** !
- रामचंद्र देखणे, यशवंत पाठक, शांता शेळके, प्रवीण दवणे, हेमा लेले, मल्हार अरणकल्ले, आ.ना.पेडणेकर इ. साहित्यिकांच्या **ललित लेखांनी नटलेला अंक** !
- कांचनगंगा गंधे, प्रकाश तुपे, पंडित विद्यासागर, पुरुषोत्तम जोशी, श्रीनिवास पाटील इ. मान्यवरांच्या विविध क्षेत्रातल्या **ज्ञानवर्धक लेखांची मालिका** !
- आनंद नाडकर्णी, दिलीप कुलकर्णी, वसंत गोवारीकर, गिरीश बापट, हेमंत जोगदेव यांचे चिंतनीय, विशेष लेख !
- विज्ञान प्रयोग,हस्तकौशल्ये,कला-छंद-संगीत-व्यायाम,कोडी,विनोद,बौद्धिक खेळ,नावीन्यपूर्ण स्पर्धा यांनी भरगच्च अंक !

***सुमारे २२५ पृष्ठसंख्येचा, आकर्षक छपाईचा, संग्राह्य अंक ! सोबत आकर्षक भेटही !***

***शंभराव्या अंकाच्या निमित्ताने प्रकाशनपूर्व नोंदणी करणाऱ्यांना***

***खास सवलतीची किंमत रु. २५/-*** *(मूळ किंमत रुपये ५०/-)*

***१० ऑक्टोबरपूर्वी स्थानिक/मुख्य कार्यालयात रक्कम भरून आपल्या अंकांची निश्चिती करा !***

## सभासदांसाठी दिवाळी अंक वितरण व्यवस्था

दिवाळी अंक आपल्या गावातील वितरण केंद्रावरून २० ऑक्टोबरनंतर घेऊन जावा.ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नसतील त्यांनी रु.३०/- ची मनिऑर्डर करावी, त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने/कुरिअरने अंक पाठविला जाईल. (ज्यांनी पूर्वीच १५०/- रुपये वर्गणी भरली आहे त्यांनी जादा पैसे पाठवू नयेत) वितरण केंद्रे नसलेल्या गावांमधील सभासदांनी आपल्या सोयीच्या वितरण केंद्रावरून समक्ष अंक घेऊन जावा. त्यासंदर्भात मुख्य कार्यालयाला पोस्टकार्ड पाठवून कळवावे म्हणजे त्याप्रमाणे संबंधित केंद्रावर कळविले जाईल.

**यावर्षी साध्या पोस्टाने दिवाळी अंक कोणालाही पाठविला जाणार नाही याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

दिवाळीची सुट्टी अधिक आनंदात घालविण्यासाठी आपला अंक वेळेत घेऊन जा.अंक अनेकांना भेट द्या ! अनेकांना मासिकाचे सभासद करून घ्या ! वितरणाच्या अधिक तपशीलासाठी या अंकातील पृष्ठ क्र.२२ पाहावे.

छात्र प्रबोधन

वर्ष १ अंक १
सौरआश्विन, शके १९२२

ॐ



इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतर्जगतात


# अंतरंग


| | | |
|---|---|---|
| संवाद | २ | महेन्द्र सेठिया |
| महात्मा जोतीबा फुले | ३ | वर्षा कुलकर्णी |
| कविता पानोपानी | ६ | |
| कटिबद्ध | | यशवंत पाठक |
| गुपित | | केवता मेहेंदळे |
| कथा | | |
| पेरूच्या बागेतील रहस्य (भाग २) | ७ | नीता जोशी |
| पोलिस काल, आज आपण उद्या | १२ | प्रभाकर शुक्ल |
| चला एकलव्य बनूया | १५ | आश्लेषा महाजन |
| घड्याळाची गोष्ट | १७ | मल्हार अरणकल्ले |
| कथा | | |
| इंटरनेटवरून मदतीची हाक | १९ | नीलिमा करमरकर |
| दिवाळी अंक वितरण व्यवस्था | २२ | |


**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
**महेन्द्र सेठिया**

**संपादकीय मंडळ**

**महेन्द्र सेठिया** B.E.,M.Ed. **शैलजा देशमुख** M.A., M.Ed.
**श्री.दत्ता टोळ** B.A.,B.Com. **विवेक पोंक्षे** M.S.c., B.Ed.
**कार्यकारी संपादक** – वर्षा कुलकर्णी
**मुखपृष्ठ व आतील सजावट** – गिरीश सहस्रबुद्धे
**मलपृष्ठ कविता** – श्री.जयंत भिडे, पुणे ☎ ४४४४११७
(तारका त्रैमासिकाच्या वंदेमातरम् विशेषांकामधून साभार)
**अक्षर जुळणी** – छात्र प्रबोधन,पुणे ३०
**संपर्क पत्ता–छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी, ५१०,सदाशिव पेठ, पुणे ३०
☎(०२०)४४७७६९१,४४७८०९५ फॅक्स : ४४९१८०६
**E-mail :** prabodhni@tvsnl.com
**प्रकाशन दिनांक**–राष्ट्रीय सौर १ आश्विन,शके१९२२, २३ सप्टेंबर २०००
**वर्गणी :वार्षिक :** रु.१२५/- **द्वैवार्षिक :** रु.२४०/-
**त्रैवार्षिक :** रु.३५०/- **आजीवन :** रु.२०००/-
**या अंकाची किंमत :** रु.१०/-



ताठ मान हे भाग्य समज तू, लाचारी कधी शिकू नको, न्यायासाठी लढणारा हो, इमान आपले विकू नको.

**छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे ! ... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!**

## संवाद

***प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,***

*पुन्हा एकदा मुखपृष्ठावर 'छात्र प्रबोधन' हे नाव पाहून बरं वाटलं ना ! शासकीय आघाडीवर कागदपत्रांच्या कचाट्यात, काही काळ मूळ नाव बाजूला ठेवून, वेगळ्या रूपात आपण भेटत होतो खरं ! पण शेवटी नावाशीही नातं जडलेलं असतंच की ! हो ना !*

*त्याचं असं झालं... ८ वर्षांपूर्वी दिल्लीशी पत्रव्यवहार करून 'छात्र प्रबोधन' हे नाव आपण मिळवलं (दिल्लीच्या कार्यालयामध्ये, भारतभरात या नावाने दुसरं कोणतंही नियतकालिक चालत नाही ना याची खात्री करून मगच ते नावाला मान्यता देतात)त्यानुसार पोस्टाच्याही रितसर परवानग्या मिळवत गेलो. सवलतीच्या दरात मासिक पोस्ट करण्यासाठी आवश्यक पोस्टाच्या परवान्याचे दरवर्षी नूतनीकरण करावे लागते. यापद्धतीने गेली ८ वर्ष आपल्याला परवाना मिळत गेला. यावर्षी परवान्याच्या नूतनीकरणाचे वेळी दिल्लीहून नियतकालिकाशी निगडित नोंदणी क्रमांक मिळवून आणायला पोस्टाने सांगितले आणि परवानगी स्थगित केली. दिल्लीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी मासिकाच्या नोंदणीपासून सुरुवात करायला लागेल असे सांगितले अन् मग पुन्हा पहिल्यापासून सगळी प्रक्रिया सुरू झाली. म्हणून हा अंक पुन्हा 'वर्ष १ अंक १' या प्रमाणे प्रकाशित करत आहोत. मुळात हा 'वर्ष ९ अंक ३' म्हणजेच एकूण वाटचालीतला 'नव्याण्णववा अंक! तुम्हाला हे सर्व माहीत असावं म्हणून थोडक्यात सांगितलं.*

***पुढचा अंक अर्थातच शंभरावा अंक !** इसवी सनाच्या या सहस्रकातला शेवटचा **दीपावली विशेषांक** आणि म्हणूनच तो खऱ्या अर्थाने विशेष होईल असा प्रयत्न चालू आहे. गेले ३-३ ।। महिने या दिवाळी अंकाच्या निर्मितीची प्रक्रिया चालू आहे. आता त्याला चांगलाच वेग आलाय. मसालेदार पदार्थ शिजायला लागल्यावर त्याच्या खमंग वासाने जसं तोंडाला पाणी सुटतं अन् स्वयंपाक घरात येरझाऱ्या घालत, 'झालं का ? घेऊ का ताट?' असं ४-४ वेळा आपण आईला विचारून भंडावून सोडतो, तसंच या दिवाळी अंकाचंही होतंय! थोडा धीर धरा !! सहामाहीची परीक्षा संपण्याच्या आत हा अंक सुट्टीची खास भेट घेऊन तुमच्याकडे येतोय.*

***शतकपूर्तीनिमित्त हा दिवाळी अंक आपण मोठ्या सवलतीत सर्वांपर्यंत पोहोचवत आहोत. तेव्हा १०-१० अंकांची तरी मागणी अंक मिळताच मुख्य अथवा स्थानिक कार्यालयात नोंदवून ठेवा.** नंतर तो अंक मित्र-मैत्रिणींना-नातेवाईकांना भेट द्या किंवा विकत घ्यायला सांगा. तुमचा असा कृतियुक्त प्रतिसाद छात्र प्रबोधनच्या पुढच्या वाटचालीसाठी बळ मिळवून देईल यात शंकाच नाही.*

*मधल्या ३-४ महिन्यांच्या काळात अंकात थोडाफार अनियमितपणा आला होता तो तुम्ही समजून घेतलात त्याचं बरं वाटलं. औरंगाबादच्या एका प्रबोधिकेनं स्वत:च्या भावना व्यक्त करणारं एक पत्र पाठवलंय. ती म्हणते,''मी गेली ५ वर्षे छात्र प्रबोधनची सभासद आहे अन् आता तर आजीवन सभासदही झालेय. सध्या इऊड च्या पहिल्या वर्षाला शिकत आहे. माझ्या व माझ्या कुटुंबातील व्यक्तिंच्या व्यक्तिमत्त्वात, जीवनात छात्र प्रबोधनला अनन्य साधारण महत्त्व आहे. छात्र प्रबोधनच्या वाटचालीत कोणतेही अडथळे आले तरी आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत. तुम्ही आम्हाला हाक द्या, आम्ही प्रबोधक वर्ग असंख्य हातांनी मदतीला धावून येऊ.'' ५ वर्षात एकदाही संपर्क न करणाऱ्या प्रबोधिकेच्या मनातील ही भावना प्रातिनिधिक मानायची ना ! अशा पत्रांनी उत्साहही वाढतो अन् जबाबदारीही !*

*छात्र प्रबोधन मासिकावर जरी पुन्हा वर्ष १ अंक १ असं छापायला सुरुवात झाली असली तरी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण चळवळीची वाटचाल तर अखंड आहे ! ती महाराष्ट्राच्या अन् भारताच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवायला तुम्ही बरोबर असायलाच हवे आहात ! त्यासाठी हाक मारायची वाट कशाला पाहायला हवी! हो ना !*

*मागच्या तीन पुस्तकांमधले हितगुज थोडं मोजून-मापून लिहायला लागत होतं, त्यामुळे थोडं अवघडल्यासारखं वाटतं होतं. खूप दिवसांनी आपल्या घरी आल्यावर जसं मोकळं वाटतं, तसंच काहीसं हा संवाद लिहिताना वाटतंय !*

*बरंय ! सहामाही परीक्षा अन् त्यानंतरच्या सुट्टीतले मनसुबे पूर्ण होण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा! सुट्टीतल्या शिबिराला आवर्जून या.*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

**ज्यांची दृष्टी कधी न कष्टी, निर्भयतेची करीते वृष्टी । मनात त्यांच्या नित्य तरंगे, भवितव्याची सुंदर सृष्टी ।।**

# महात्मा जोतीबा फुले

– वर्षा कुलकर्णी



१८५० च्या आसपासचा काळ हा देशाच्या पारतंत्र्याचा काळ ! रूढी-परंपरांचा अभिमान, धर्मशास्त्र प्रामाण्याचा पगडा आणि सार्वत्रिक अज्ञान यामुळे त्याकाळातील महाराष्ट्रातील समाजाची स्थिती फारच मागासलेली होती. त्यात स्त्रिया आणि अती शूद्र यांची स्थिती तर फारच दयनीय होती. ती सुधारायची असेल तर मुलींना शिक्षण दिले पाहिजे, या विचाराने प्रेरित होऊन, एक ध्येयवेडा तरुण समाज परिवर्तनाच्या कल्पनेने भारला गेला होता. मुलींना शिक्षण द्यायचे तर प्रथम शाळा सुरू करायला पाहिजे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात ही क्रांतिकारी घटना होती. शाळा तर सुरू झाली; पण शिकविण्यासाठी कोणी शिक्षक मिळेना. यावर उपाय म्हणून या तरुणाने स्वत:च्या पत्नीलाच, स्वत: शिक्षण देऊन अध्यापक म्हणून काम करण्यास प्रेरित केले. हा तरुण म्हणजेच आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्य प्रवर्तक, महात्मा जोतिबा फुले !

तर चूल आणि मूल यात गुंतून न पडता घराचा उंबरठा ओलांडणारी व सामाजिक कार्यात भाग घेणारी महाराष्ट्रातील पहिली स्त्री, सावित्रीबाई फुले या होत.

जोतिबांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी पुणे जिल्ह्यात झाला. घरची परिस्थिती बऱ्यापैकी होती. त्यामुळे त्यांचे शालेय शिक्षण सुरळीतपणे पार पडले. शाळेत असताना त्यांची पुस्तकांशी मैत्री जडली होती. ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ या साधुसंतांच्या वाङ्मयाबरोबरच पाश्चात्य विचारवंत मिल्ल, स्पेनसर, थॉमस पेल, यांच्या विचारांचा संस्कार जोतीबांच्या मनावर होत होता. आपल्या आजूबाजूच्या समाजाचे निरीक्षण, थॉमस पेलचा विचारांना अभ्यास आणि स्वत: केलेले चिंतन यातून जोतीरावांनी सामाजिक कार्यात उडी घ्यायचे ठरविले.

इ.१८४८ मध्ये सार्वजनिक जीवनात प्रवेश केल्यानंतर स्त्री शिक्षणाचे कार्य त्यांनी प्रथम हाती घेतले. जोतीरावांच्या जीवितकार्याचे १८५४ ते १८६५ व १८६५ ते १८९० असे दोन ठळक कालखंड दिसतात. पहिल्या कालखंडात त्यांनी स्त्रिया आणि अस्पृश्य यांच्या शिक्षणाचे कार्य हाती घेतले. समाज सुधारायचा असेल तर सगळ्या कष्टकरी समाजाला हरप्रयत्नाने जाग आणली पाहिजे. आपल्या अधिकारांची त्यांना ओळख पटवून द्यायला पाहिजे आणि ते मिळविण्यासाठी एकत्रितपणे झगडण्यास त्यांना प्रवृत्त केले पाहिजे, हे लक्षात घेऊन जोतिरावांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तेव्हापासून त्यांच्या जीवनातील दुसरा प्रभावी कालखंड सुरू झाला.

सावित्रीबाईंच्या समवेत कन्याशाळा चालवत असताना समाजाकडून नव्हे तर प्रत्यक्ष त्यांच्या घरातूनही त्यांना विरोध झाला. आपल्या पत्नीला घेऊन ध्येयपूर्तीसाठी त्यांना घर सोडावे लागले. शाळेसाठी मुले-मुली जमवणे, त्यांना स्वच्छ करून कपडे पुरविणे, त्यांना पाट्या-पेन्सिली देणे, पिण्यास पाणी पुरविणे, यासारख्या मुलभूत गोष्टीही त्यांना कराव्या लागल्या. शाळेमधे जात असताना सावित्रीबाईंना लोकांकडून खूप अवहेलना सहन करावी लागली. प्रसंगी दगडांचा, शेणाच्या गोळ्यांचा मारही सहन करावा लागला. असा प्रखर विरोध समाजातील काही घटकांकडून होत असला तरी त्यांच्या कार्याचे महत्त्व जाणून मदत करणारेही अनेकजण भेटले. हंटर कमिशन पुढील साक्षीमध्ये शिक्षणाच्या पुनर्रचनेची गरज आणि स्त्री शिक्षणाचा आग्रह त्यांनी हिरीरीने मांडला.

सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट, धार्मिक व सामाजिक गुलामगिरी समूळ नष्ट करणे हे होते. नवनवीन ज्ञान ग्रहण करण्यास मने तयार ठेवण्याची वृत्ती म्हणजे सत्यशोधकी वृत्ती, ही त्यांची भूमिका होती. सत्यशोधक पद्धतीने विवाह करण्याची प्रेरणा त्यांनी अनेक तरुणांना दिली.

**पवित्र मज पोलादी ठोसा, अन्यायांच्या छातीवरचा। पवित्र मजला आणिक गहिवर, माणुसकीचा, माणुसकीचा।**

त्यामध्ये केवळ धार्मिक सुधारणा अभिप्रेत नव्हती तर तर्कशुद्ध आर्थिक आणि सामाजिक विचार होता. या विवाहांना ब्राह्मण पुरोहितांच्या मध्यस्थीची गरज नसायची. विवाह सामुहिक पद्धतीने केले जायचे. त्यामुळे लग्नावर होणारा खर्च आपोआप कमी होत असे. अर्थात सनातन्यांचा कडाडून विरोध आणि समाज सुधारकांचा पाठिंबा,असे मिश्र विचारांचे वादळ त्याकाळात उभे राहिले.

१८९० मधील नापितांची सभा ही एक क्रांतिकारी घटना होती. त्याकाळामध्ये तरुण विधवा स्त्रीचे केशवपन करून तिला कुरूप केले जात असे. या दुष्ट चालीविरुद्ध जनजागृती करायची तर ते काम सोपे नव्हते ! म्हणून जोतीरावांनी एक अभिनव उपाय शोधून काढला. शहरातील सर्व नापितांची सभा बोलवून विधवेचे केशवपन करू नये, असा त्यांनी ठराव मांडला. समाजातील या दुष्ट रुढीला खीळ घालण्याची जोतीबांची कल्पना ही फारच अभिनव अशी होती.

समाजातील अस्पृश्यता नाहीशी व्हावी, म्हणून त्यांनी स्वत:च्या घरातील पाणवठा सर्वांसाठी खुला केला. अस्पृशांसाठी त्यांनी शाळा सुरू केल्या. मानवतेच्या धर्माचा त्यांनी पुरस्कार केला. केवळ स्त्रिया आणि अस्पृश्य यांच्यापुरताच मर्यादित विचार न करता, महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्याच्या केविलवाण्या जीवनक्रमाने त्यांचे लक्ष वेधून घेतले. त्यातून 'शेतकऱ्याचा आसूड' हा मौल्यवान ग्रंथ जन्माला आला. शेतकऱ्यांच्या अगतिकतेचे मूळ त्यांच्या अज्ञानात, अशिक्षितपणात होते.

विद्येविना मती गेली,
मतीविना नीती गेली,
नीतीविना गती गेली,
गतीविना वित्त गेले,
वित्ताविना शूद्र खचले.

अशा प्रभावी शब्दात शूद्रांच्या स्थितीचे वर्णन जोतीबांनी केले आहे. सामाजिक जीवनाच्या वेगवेगळ्या क्षेत्रांमधून होणाऱ्या आर्थिक शोषणाकडे या ग्रंथाद्वारे जोतीरावांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. सडका, पाटबंधारे बांधण्याची कामे जिथे चालत, तेथे मजूरांना कमी वेतन दिले जाई. या अन्यायाविरुद्ध मजूरांनी एकत्र येऊन संघटना बांधून हे प्रश्न सोडवावेत, असा विचार त्यांनी जोरदारपणे मांडला. 'गुलामगिरी' या पुस्तकात, गरिबांच्या शोषणाविरुद्ध त्यांनी अतिशय पोटतिडिकेने लिहिले. गरीब शोषितांची बाजू त्यांनी सरकार दरबारीही मांडली.

डयूक ऑफ कॅनॉटच्या भेटीनिमित्त, पुण्यात एक समारंभ आयोजित करण्यात आला होता. या समारंभाला लंगोटी नेसून, खांद्यावर घोंगडी व डोक्याला मुंडासे गुंडाळून अस्सल देशी वेशात महात्मा फुले आले होते. त्यांनी तिथे भाषण करण्याची परवानगी मागितल्यावर, हा माणूस काय बोलणार ? असे तेथील प्रतिष्ठित मंडळींना वाटले. महात्मा फुले उभे राहून अस्खलित इंग्रजी भाषेत बोलू लागले. ते म्हणाले,''डयूक साहेब, या देशातील बहुसंख्य जनता शेतकरी आहे. त्यांचा प्रतिनिधी म्हणून त्यांच्याच पोशाखात मी आपल्या भेटीला आलो आहे. हिंदुस्थानच्या या बहुसंख्य जनतेचे हित तुम्हाला करायचे असेल तर त्यांचे अज्ञान घालवा, त्यांना प्राथमिक शिक्षण



**प्रकाशदायी तुम्ही सूर्य अन् तुम्ही बरसते मेघ, तुम्हीच आमुच्यासाठी पेरिली नवसृजनाची रेघ.**

मोफत मिळण्याची सोय करा, असा त्या लोकांचा प्रतिनिधी म्हणून माझा निरोप तुमच्या राणीसाहेबांना कळवा.'' फुल्यांच्या या नाट्यमय भाषणाने सभेत एकच गांभीर्य निर्माण झाले. कष्टकरी सामान्य माणसाच्या खडतर जीवनाशी त्यांचे असलेले तादात्म्य आणि सहजस्फूर्त विचार पोहोचविणारी, अंत:करणाला भिडणारी भाषा यांचे दर्शन या प्रसंगी घडले.

सत्यशोधक समाजाचे विचार मांडताना सर्व माणसे ही ईश्वराची लेकरे आहेत, ईश्वराची भक्ती करण्याचा अधिकार प्रत्येकास आहे, त्यासाठी पुरोहितांच्या मध्यस्थीची गरज नाही. मनुष्याचे श्रेष्ठत्व जातीने नाही तर गुणाने ठरते, हे विचार त्यांनी आग्रहाने मांडले. पुनर्जन्म, कर्मकांड, जपतप या गोष्टी अन्यायमूलक आहेत, हे त्यांनी समाजाला पटवून देण्याचा प्रयत्न केला. सावकारी पाश, दारूचे व्यसन, ब्राह्मणांचे वर्चस्व इ. विषयांवर त्यांनी नाट्यरूपात, विडंबनात्मक लेखन केले.

जोतीरावांनी आपल्या अंतर्भेदी दृष्टीने समाजाच्या वास्तवस्थितीचा गुंता उलगडण्याचा प्रयत्न केला. प्रत्येक वेळी शोषितांच्या बाजूने ते खंबीरपणे उभे राहिले. त्यांची गाऱ्हाणी वेशीवर टांगली. हिंदू समाजाच्या एकसंधतेचा त्यांनी आग्रह धरला. त्या काळामध्ये बहुजन समाजाच्या मनावर अज्ञान आणि पूर्वपरंपरेचे दडपण होते. अशा प्रतिकूल सामाजिक स्थितीत रूढी-परंपरांवर हल्ला चढविणे, सामाजिक संघर्षाच्या रण-मैदानात उतरणे हे काम सोपे नव्हते. हे असिधाराव्रत जोतीबांनी आयुष्यभर पाळले.

२७ नोव्हेंबर हा त्यांचा पुण्य स्मरण दिन !

आज त्यांच्या निधनाला ११० वर्षे झाली. मधल्या काळात समाजात अनेक स्थित्यंतरे झाली. फक्त शिक्षणाच्याच, नाही तर स्त्रिया पुरुषाच्या बरोबरीने अनेक क्षेत्रात पुढे आल्या. तरीही न्याय आणि समता यावर आधारलेले, त्यांनी पाहिलेले आदर्श समाजरचनेचे चित्र अजूनही साकारलेले नाही. शोषणाचे स्वरूप आणि पद्धती बदलल्या तरी शोषण आहेच. ग्रामीण आणि शहरी समाज यांच्यातील तफावत अजून मिटलेली नाही. ग्रामीण भागातही काही थोड्या लोकांच्या हातात राजकीय सत्ता केंद्रित झालेली आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून महात्मा फुले यांचे अपुरे राहिलेले नवसमाज निर्मितीचे कार्य आपण जिद्दीने तडीला नेले पाहिजे. त्यासाठी त्यांच्या विचारातील नित्यनूतन भाग कोणता आणि तात्कालिक महत्त्वाचा भाग कोणता याचे भान ठेवले तर जोतीरावांचे विचार आणि कृती आपल्याला नेहमीच स्फूर्ती देत राहील !

⌘ ⌘

**- वर्षा कुलकर्णी**
'मैफल' शिक्षकनगर,
कोथरुड,पुणे

---

**ज्ञान प्रबोधिनीच्या शैक्षणिक उपक्रम संशोधिकेद्वारा दिवाळी २००० च्या सुट्टीतील प्रशिक्षण वर्ग**
**(इ.८वी ते१०वीच्या विद्यार्थ्यांसाठी)**

१) स्वयंअध्ययन कौशल्ये **(Self Study Skills)** :- मराठी व इंग्रजी माध्यमांच्या स्वतंत्र तुकड्या. वेळ दु. २ ते ५. या वर्गात स्वत:चा अभ्यास स्वत: कसा करावा, हे आधुनिक तंत्रे व चाचण्या,सराव पाठ यांच्या साहाय्याने शिकता येईल. श्रवण, वाचन, स्मरण, लेखन, टिपण, नियोजन ही कौशल्ये शिकविली जातील.
२) लेखन कौशल्य (मराठी माध्यम) :- वेळ स.९ ते १२।। या वर्गात निबंधलेखन, परिच्छेदलेखन, रिपोर्टलेखन, पत्रलेखन इ. लेखनांत सुधारणा कशी करता येईल, याचे मार्गदर्शन केले जाईल.
३) इंग्रजी संप्रेषण **(Development of English communication Skill)** (मराठी माध्यम) वेळ - दु. २ ते ५ हल्ली इंग्रजी पाठ्यपुस्तकातून संप्रेषण कौशल्यावर अधिक भर दिलेला आहे. त्या दृष्टीने वाचन, लेखन, श्रवण, संभाषण यात सुधारणा कशी करता येईल, याचे मार्गदर्शन या वर्गात केले जाईल.
वरील सर्व वर्गांसाठी - शुल्क :- प्रत्येक वर्गासाठी रु.२००/-स्थळ :- ज्ञान प्रबोधिनी, सदाशिव पेठ, पुणे
कालावधी :- सोम. १६ ऑक्टो. ते शनि.२१ ऑक्टो.२०००, एक आठवडा.
नावनोंदणी :- १ ऑक्टो.२००० पासून ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ३० येथील चौकशी केंद्रात करावी.
(बाहेर गावच्या विद्यार्थ्यांसाठी निवासाची सोय ज्ञान प्रबोधिनीतर्फे होऊ शकणार नाही, याची नोंद घ्यावी.)

**उभी हयात जन्माची,ज्याति मातीची पेटली । आज क्षितिजाची भेट, लाल मातीने घेतली ।**



# 'गुपित'

आज एक गुपीत मी,
तुम्हाला सांगणार आहे.
आमच्या घरातल्या सगळ्याचं
'पावसाशी' नातं आहे ।

कसं म्हणून काय विचारंता?
नातं, पाऱ्यासारखं आहे
स्वच्छ, नितळ अन् स्वभावाशी
जुळवून नेणारं आहे ।

ढग गडगडल्यासारखा,
म्हणे मी हसत सुटतो
धडाड् धुडुम् धडाड धुडुम्
मोठ-मोठ्याने गरजतो ।

धोऽऽधो आषाढातल्या धारा
बाबांची हसण्याची तीच तऱ्हा
हसणं मग आवरता येत नाही
शेवटी, पोट दुखायचं रहात नाही ।

रिमझिम रिमझिम संथ सरीत
आई हसते त्याच त्या लयीत
ह्या सरींनी 'गारवा' मुरत जातो
आईच्या हसण्याचा असा 'संसर्ग' असतो ।

अवखळ, झुळझुळ झऱ्यापरी
ताई, एक नंबरची लहरी
लाजत असते, मागे बघते
लपंडाव जणू स्वत:शीच खेळते ।

शुक् ऽशुक्ऽऽ शुक हसू नका
पावसाला ही गंमत मुळी, सांगू नका
आहे, त्याचा न् आमचा 'घरोबा' आहे,
कालचा न् आजचा नव्हे, बराच जुना आहे।

***

**- कविता मेहेंदळे,**
६९२/१, सुखदा सोसा.,पुणे-सातारा रोड,
मार्केडयार्ड चार्डरोड, पुणे ३७

**कल्पतरूंची फुले तारका वेचुन आणिन खाली । वहिन मतिप्रय वसुंधरेला नित्याची लाखोली ।**


# कविता पानोपानी

## कटिबद्ध

शतकफुलांची नवी फुले ही झेलण्यास कटिबद्ध असू
सहस्त्रकाचा नवा सूर्य हा चंदणमैत्री तसू तसू ।।धृ.।।
विज्ञानाची करू पौर्णिमा
अभ्यासाचा वाढवु महिमा
अंधारातहि गर्जू आम्ही नव्या युगाचे हसू ।।१।।
वडिलांच्या त्या सुंदर आज्ञा
कर्तव्यहि मम करू मनोज्ञा
नव्या प्रकाशी निर्मू आपण ज्योत्स्नेचे शुभरसु ।।२।।
ध्येयाच्या लढवु खिंडी
भ्रष्टास ठेचु दूतोंडी
डोळ्यांतिल गरिबांचे अश्रु शब्द बनुनि सोसु ।।३।।

***

**– यशवंत पाठक**
प्रोफेसर कॉलनी
मनमाड ४२१ १०४
जि. नाशिक.



**कल्पतरूंची फुले तारका वेचुन आणिन खाली । वहिन मतिप्रय वसुंधरेला नित्याची लाखोली ।**

# पेरूच्या बागेतील रहस्य !

## (भाग २)

**संशयास्पद सलील.**

सकाळी साडेआठला सगळेजण बागेत पोहोचले. तेव्हा तिथे एकदम शांत व प्रसन्न वातावरण होतं. बागेतल्या छान हवेमुळे सकाळी खूपच प्रसन्न वाटत होतं. थोडा वेळ चालल्यावर त्यांनी एक छानशी हिरवळीची जागा पाहून सतरंजी पसरली. सर्व सामान तेथे ठेवले. भेंड्या, दमशेरा, साखळी-साखळी असे निरनिराळे खेळ खेळताना, दुपार केव्हा झाली तेच त्यांना कळलं नाही. पोटात कावळे ओरडायला लागल्यावर सर्वात आधी परागला डब्याची आठवण झाली.

''आईने डब्यात मस्त पुरी-भाजी दिली आहे.''

''माझ्या डब्या बहुतेक सँडवीच आहे. केव्हा एकदा खातोय असं झालंय.'' डबा उघडत चिन्मय म्हणाला.

सगळ्यांचीच हाता-तोंडाची लढाई चालू झाली. हसत-खेळत ते डबा खात होते. थोड्यावेळाने सहावी-सातवीत असणारी चार मुले त्यांच्याकडे येताना दिसली. पण त्यांच्यापासून थोड्याच अंतरावर ती थांबली. त्यांच्यातल्या एका मुलाने वर बोट दाखवून खिशातून काहीतरी काढले आणि ते वर फेकले. तो दोराचा फास होता आणि त्यात अडकून एक सरडा खाली आला. ती मुलं आता सरड्याला मारणार, हे लक्षात येताच विवेक उठून त्यांच्या दिशेने धावला. त्याच्या पाठोपाठ पराग आणि सौमित्रही धावले.

''ए ! सोडा त्या सरड्याला. काय चाललंय हे ? लाज नाही वाटत मुक्या प्राण्यांना त्रास देताना.'' विवेकच्या ओरडण्याने ती मुलं एकदम दचकली. तोपर्यंत चिन्मयही तेथे येऊन पोहोचला.

''कोणत्या शाळेचे विद्यार्थी तुम्ही? तुमची तक्रार केली पाहिजे.'' परागने दरडावत विचारलं. पण अनपेक्षितपणे सरडा पकडणाऱ्या मुलाने, दोरी सोडून दिली आणि परागच्या अंगावर झेप घेतली. परागला खाली पाडून त्या मुलाने मारायला सुरुवात केली. विवेक आणि चिन्मय त्याच्या मदतीला धावले; पण तोपर्यंत दुसऱ्या मुलांनी खालचे दगड उचलून त्यांच्या दिशेने फेकले. ही मुले एवढा आक्रमक पवित्रा घेतील, असं परागला काय कोणालाच वाटलं नव्हतं. त्यामुळे चौघंही बेसावध होते. पण एकदम दगड बसल्यामुळे विवेक कळवळून खाली बसला. ते दृश्य पाहून रूपाली आणि पल्लवी फारच घाबरल्या. त्या मदतीसाठी इकडे तिकडे पाहात होत्या. तेवढ्यात त्यांच्यातल्या एका धटिंगणाने चिन्मयलाही खाली पाडले. ते बघून पल्लवी मदतीला कोणालातरी बोलवावे, यासाठी रस्त्याच्या दिशेने धावत सुटली. तिला एक कॉलेजमधला मुलगा वॉकमन लावून झाडाखाली बसलेला दिसला.



''प्लीज तुम्ही जरा मदतीला याल का? तिकडे काही मुलं माझ्या भावाला मारताहेत.'' तिचा काकुळतीचा स्वर ऐकून तो मुलगा लगेच उठला आणि दोघेही धावतच परत आले.

''ए, काय मारामारी चाललीये ? सोडा त्याला आधी.'' परागला मारणाऱ्या मुलाचे बखोटं धरत एकदम जरबेच्या स्वरात त्या मोठ्या मुलाने विचारले. एकूण रागरंग पाहून मारामारी करणाऱ्या त्या मुलाने, एकदम हिसका देऊन आपला हात सोडवून घेतला आणि पळ काढला. त्याच्या मागोमाग बाकीची मुलंही पळाली. हे सगळं एवढ्या पटकन झालं की कोणालाच नीट कळलं नाही. स्वत:ला सावरून घेत पराग म्हणाला Thank you very much. तुम्ही आला नसतात तर मला चांगलाच मार खावा लागला असता.'' त्याला फार ओशाळल्यासारखं होत होतं. ''पण तुम्ही मारामारी का करत होता?'' त्या मुलाने विचारलं. ''माझं नाव पराग आणि हे आमचं मित्रमंडळ. आम्ही येथे सहलीला आलो आहोत. ती मुले सरड्याला पकडून मारत होती म्हणून आम्ही उठून त्यांना अडवलं तर त्यांनी ही अनपेक्षित

**सुंदर जग हे सृष्टी सुंदर, अशीच देवा असो निरंतर ।**

मारामारी चालू केली.''

''असं होय ! मी सलिल कामत. येथे भाऊसाहेब पवार इंजिनिअरींग कॉलेजमध्ये आहे. हॉस्टेलवर राहातो. ही बाग मला खूप आवडते म्हणून मी नेहमी येथे येतो असो. आता पुन्हा अशी अंगाशी येणारी मारामारी करू नका. बाय.''

''अरे सलिलदादा, तू पण आमच्याबरोबर डबा खायला ये ना.'' विवेकने त्याला आमंत्रण दिले. ''ठीक आहे. चला खाऊया तुमचा खाऊ थोडासा'' सलिल म्हणाला. अशातऱ्हेने सगळे डबा खायला बसल्यावर चिन्मय म्हणाला, ''छे ! आपण एवढ्या लहान मुलांकडून मार खातो तर मोठ्या चोराला काय पकडणार ?'' ''हे काय नवीन आता?'' सलिलने आश्चर्याने विचारले. '' तुला आनंदकाका म्हणजे निवृत्त मेजर आनंद रास्ते माहीत आहेत का? त्यांच्याकडे तीन दिवसांपूर्वी चोरी झाली ते?'' ''हो मी ऐकली ती बातमी,मग?'' सलिल.

''आम्हाला त्याच चोराला पकडायचं आहे.'' चिन्मयने सांगितले. ''ते आमचे खूप लाडके काका आहेत. त्यांची सगळी शौर्यपदके चोरीला गेल्यामुळे ते खूप दु:खी आहेत. पोलिसांना पण अजून काही कळले नाही. पण त्यांचा असा संशय आहे की चोरी करणारा माणूस खूप छोट्या हातांचा असणार, म्हणजे साधारण त्याचे हात पल्लवीएवढे लहान असणार.'' सौमित्रने सांगितले. ''पण तुम्ही कसे काय पकडणार आहात ? आणि कशासाठी?'' सलिलला खूपच आश्चर्य वाटत होतं. ''अरे, काकांनी चोराला पकडण्यासाठी दहा हजारचे बक्षीस लावले आहे.'' रश्मी म्हणाली. ''ग्रेट! दहा हजार रुपये ! ही तर केवढी तरी रक्कम आहे.'' असं म्हणून सलिल दोन क्षण विचारात पडल्याप्रमाणे शांत बसला. नंतर एकदम म्हणाला, ''लहान तळहात असलेला माणूस ! अरे, हा तर फारच महत्त्वाचा दुवा आहे. हा धागा आपल्याला नक्की चोरापर्यंत पोहोचवेल.'' सलिलच्या बोलण्याने पराग एकदम सावध झाला आणि त्याने विचारले, ''तुला काय माहिती आहे याची?''

''आता चोरीचा या घटनेशी संबंध आहे की नाही ते मला माहीत नाही. पण काल रात्री मी एक विचित्र घटना पाहिली. ती सांगतो.'' सगळेजण उत्तेजित होऊन सलिलजवळ सरकले आणि लक्षपूर्वक ऐकू लागले. ''मी बरेचदा या बागेत येतो. मला खूप आवडतं इथं. परवा रात्री मी मागच्या बाजूच्या पाऊलवाटेने येऊन इथून जवळच बसलो होतो. तेवढ्यात आमच्याच हॉस्टेलवर राहाणारा एक मुलगा टॉर्च घेऊन येथे आला. मला वाटलं तोही माझ्यासारखाच असेल म्हणून मी हाक मारणारच होतो, पण तो फार घाईत असल्यासारखा वाटला. तो भराभर एका झाडावर चढला आणि थोड्यावेळाने सरसर उतरला. मला खूपच आश्चर्य वाटलं. म्हणून तो निघून गेल्यावर मीही झाडावर चढलो आणि पाहिलं तर तेथे फक्त एक ढोली होती. मी तिच्यात हात घालून पाहिलं पण माझे हात मोठे असल्यामुळे मी काहीच जाणू शकलो नाही. नंतर मी विसरून गेलो, म्हटलं असेल त्याची स्वत:ची काही मौल्यवान गोष्ट. पण आता तुमची गोष्ट ऐकल्यावर मला दाट संशय येतो आहे. चला मी तुम्हाला झाड दाखवतो. तुमच्यापैकी कोणी प्रयत्न केला तर नक्की कळेल आत काय आहे ते.'' सलिलचं बोलणं संपलं तेव्हा प्रत्येकाच्या चेहऱ्यावरची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. ही नवीन घटना त्यांना चक्क चोरापर्यंत पोहोचवणार होती.

ती शांतता सहन न होऊन विवेक उठून उभा राहिला. पण त्याला काही बोलू न देता चिन्मय गंभीरपणे म्हणाला, ''आपण घरी जाऊया. मला भीती वाटते आहे.'' चिन्मयचं बोलणं ऐकून सगळ्यांना धक्काच बसला. पण त्याच्या आवाजातला ठामपणा जाणवून पराग लगेच म्हणाला, ''खरं आहे त्याचं म्हणणं. मला पण भीती वाटते आहे. आपण घरीच जाऊया. खरंच सलिलदादा, आम्ही तुझे खूप आभारी आहोत. आमच्या घरी ये ना एकदा.'' असं म्हणून तो उभा राहिला.

या दोघांचा अचानक आवराआवरीचा नूर बघून बाकीच्यांनी पण आपापल्या पिशव्या भरल्या. सलिलला अच्छा केल्यावर ते घराच्या दिशेने चालू लागले. सलिल दिसेनासा झाल्यावर पल्लवी म्हणाली,''काय हे ? निदान ते झाड तरी बघायचं होतं. कदाचित त्याच्यातच शौर्यपदके मिळाली असती.'' ''कदाचित नव्हे नक्की त्याच्यातच ती पदके आहेत.'' चिन्मय ठामपणे म्हणाला.

''पण आत्ता जर झाड पाहिलं असतं तर पदके शोधण्याचं क्रेडिट सलिलला मिळालं असतं आणि काकांना त्याला दहा हजार रुपयेही द्यावे लागले असते. आपल्याला ती पदके आनंदकाकांना मिळवून द्यायची आहेत, ती बक्षिसाच्या रकमेशिवाय.'' ''आणि कदाचित

**वृक्ष सावली देत राहतो – लहानथोरांना । झरा वाहतो अन् फुलवतो फुले–वेलींना ।**

सलिलही चोरीत सामील असेल. त्याला त्याच्या मोठ्या हातांमुळे काही करता आलं नसेल.'' सौमित्रचा विचारही सगळ्यांना पटला.

''आता आपण असं करूया, आज रात्री इथे पुन्हा येऊया आणि लपून बसूया. सलिल जर चोरीत सामील असेल तर तो किंवा चोर नक्कीच आज पदकांसाठी इथे येईल.'' परागने सांगितले.''पण आपण सरळ पोलिसांनाच सांगूया की !'' पल्लवीने विचारले.

''पण पोलिसांना सांगितलं आणि सलिल चोर नसेल तर त्याला पदकं सापडून दिली म्हणून दहा हजार रुपये द्यावे लागतील ना आणि तेच तर नको आहे.'' रश्मीने समजावलं.

''आपण आत्ता सरळ घरी जाऊया. कोणालाही काहीच बोलू नका. तुम्ही सगळे माझ्याकडे सुट्टी आहे म्हणून राहायला या. रात्री नीजानीज झाली की आपण घरी न सांगता गुपचूप बाहेर पडू. इथे येऊन लपून बसू. एक मोठी दोरीही बरोबर आणूया. शिवाय टॉर्च आणि स्कार्फ बरोबर घेऊया. कोणत्याही प्रसंगात उपयोगी पडेल.'' परागने सांगितल्यावर सौमित्र एकदम उत्तेजित झाला.''ग्रेट! हे फारच रोमांचकारी आहे. मला वाटलंही नव्हतं ह्या सहलीने आपल्याला एवढं साहस करायला मिळेल.''

असं सगळं ठरवून प्रत्येकजण आपल्याला घरी गेले. रात्री राहायला जाण्याची परवानगी मिळवण्याचं कठीण काम प्रत्येकाने पार पाडलं. पण चिन्मयला मात्र तन्मयला घेऊनच जावं लागणार होतं. नाहीतर त्याला परवानगीच मिळाली नसती. पण तन्मयमुळेच त्यांची ही कामगिरी पार पडणार होती, याची त्याला पुसटशीही कल्पना नव्हती.

रात्री सगळेजण परागच्या खोलीत भारावल्यासारखे बसले होते. तन्मयही त्यांच्यामागे होता. त्याला चुकवण्यासाठी सर्वांनी झोपेचं नाटक केलं. तन्मय झोपल्याची खात्री झाल्यावर चिन्मयने बाकीच्यांनाही हलवलं. सगळे उठून एकदम सावकाश सभेला बसले. ''बरोबर सव्वादहा वाजता आपण येथून निघू. सर्वात प्रथम सौमित्र आणि रूपाली जातील. नंतर मी आणि पल्लवी निघू. त्यानंतर विवेक आणि रश्मी बाहेर पडतील आणि सगळ्यात शेवटी चिन्मय येईल. चिन्मय तू पुन्हा खात्री कर, तन्मय झोपला आहे की नाही याची. बरोबर पाच-पाच मिनिटांनी आपण बाहेर पडू. प्रत्येकाने टॉर्च आणि स्कार्फ बरोबर घ्या.'' परागच्या बोलण्याने सगळ्यांना स्फुरण चढले होते. एक एक मिनीट त्यांना तासाप्रमाणे वाटत होते. आज परागच्या बाबांनाही खूप उशीर होणार होता. त्यामुळे ते यायच्या आत आपण नक्की परत येऊ, अशी परागची अपेक्षा होती.

ठरलेल्या प्लॅनप्रमाणे सर्वजण निघाले. सकाळी त्यांनी जेथे डबा खाल्ला होता तेथे येईपर्यंत कोणीही काहीही बोललं नाही. रस्त्यातही ते कोणाकडेही लक्ष न देता आले होते. तरीही तोपर्यंत अकरा वाजले होते. तेथे येताच परागने अगदी हळू आवाजात लपण्याच्या जागा सांगितल्या. ''येथील जवळच्याच झुडपांमध्ये सौमित्र आणि रूपाली लपणार आहेत. त्याला अगदी लागून असलेल्या झाडावर विवेक लपणार आहे. त्याने सौमित्र आणि रूपालीला सावध करायचं आणि उजव्या हाताच्या रस्त्यावर लक्ष केंद्रित करायचं. येथे डाव्या हाताला चिन्मय तू झाडावर लप आणि सगळीकडे लक्ष ठेव. पल्लवी, रश्मी आणि मी या झुडपांच्या बेचक्यात लपतो. चिन्मय तू आम्हाला सावध कर. आणि सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे काहीही संशयास्पद आढळलं तर आपली खूणेची शिट्टी वाजवायची आणि मग प्रथम शिट्टी वाजवणाऱ्याच्या सगळ्यात जवळची व्यक्ती बाहेर पडेल आणि नंतर गरज वाटल्यास सगळ्यांनी बाहेर यायचं, नाहीतर आपली जागा सोडायची नाही.'' परागने सगळ्या सूचना दिल्यावर प्रत्येकजण गंभीर झाला आणि त्यांनी पटकन आपापली जागा घेतली. श्वास रोखून प्रत्येकजण अंधारात बघण्याचा प्रयत्न करत होते. त्या शांततेचा भंग करणारा कोणताही आवाज त्यांना फार भयानक वाटत होता. बागेतल्या वेगवेगळ्या प्राण्यांची भीती होतीच.

एकच्या सुमाराला बागेत एका कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज घुमला आणि सगळ्यांनी एकदम श्वास रोखून धरले. पाठोपाठ एक मुलगा टॉर्च घेऊन, चिन्मय ज्या झाडावर बसला होता नेमका त्याच झाडाजवळ आला. तो मुलगा झाडावर चढणार इतक्यात सलिलने धावत येऊन त्याला पकडले. ''पीटर तू ती पदके एकटा पळवून नेऊ शकणार नाही. तू खोलीतून बाहेर पडलास तेव्हाच मला संशय आला. दुपारी मी विचारलं म्हणून तुला कल्पना आली असणार की याला पदकांची काहीतरी माहिती आहे. तो धोका टाळण्यासाठी तू इथे येणार याची मला खात्री होती. पण आता मला सगळं कळलं आहे. नाही तरी तू

**परि अचानक सन्मित्राने,शस्त्रबलासह केला हमला । पलायनोवन आरक्षींना,मार्गच दुसरा नाही उरला ।**

आत्ता ती पदके विकू शकणार नाहीस. त्यापेक्षा आपण ती मेजरला परत करू आणि दहा हजार रुपये निम्मे निम्मे घेऊ.'' सलिलला बघून एकदम दचकलेला पीटर क्षणभर बावरला; पण लगेच सावरून घेत म्हणाला,''मी का वाटून घेऊ? तुझा काय संबंध ? तू काही ढोलीत हात घालू शकणार नाही. तेव्हा Get Lost'' त्यांची वादावादी चालू होती. पण चिन्मयला धीर धरणं अशक्य झालं आणि तो खाली उतरला. ते पाहून परागने शिटी वाजवली आणि सगळेच बाहेर पडले. पीटरला तर हा प्रकार काय आहे तेच कळेना. पण सलिलने चिन्मयला ओळखले आणि लगेचच त्याला पकडून म्हणाला, ''खबरदार! कोणीही हललात तर ! पीटर तूही अजिबात हालचाल करू नकोस. या मुलांना सर्व काही माहीत आहे. म्हणून शहाण्यासारखे आपण दोघे हातमिळवणी करू. चल रे, तू पटकन झाडावर चढ आणि ढोलीतून मला पदके काढून दे.'' असं तो चिन्मयला म्हणाला. चिन्मय लगेच झाडावर चढला, पण त्याचा हात काही ढोलीत जाईना. ''माझा हात आत जात नाहीये.''चिन्मय वरूनच ओरडला.

''ठीक आहे तू खाली उतर. ही मुलगी आता प्रयत्न करेल.'' त्याने पल्लवीला पकडले.

''अरे थांब ! तू किती घाबरवलंस तिला. बिचारी थरथरायला लागली. थांब मी सांगतो तिला.'' पराग धावत पुढे येत म्हणाला. आणि बाकी सगळे डशिश्रश्रलीींवि झाल्यासारखे उभे होते. ''पल्लवी धीर धर. तू हळूच झाडावर चढ आणि ढोलीत हात घाल. मी तुझ्या पाठीमागे येतो चल.'' असं म्हणून दोघेही झाडावर चढले. पल्लवी घाबरल्यामुळे पराग तिच्यामागे चढला असं सलिलला वाटलं. जरा वर गेल्यावर पराग हळूच तिला म्हणाला, ''पल्लवी घाबरण्याचं नाटक कर आणि पदके काढून माझ्याकडे दे. ह्या पानांच्या आडोशाने ते तुला नक्की जमेल.'' नंतर लगेच तो मोठ्याने म्हणाला, ''हं सावकाश, घाबरू नकोस. चल अजून थोडी वर जा. मी आहे. ढोली मिळाली का?''

तोपर्यंत पल्लवीने हात घालून एक मखमली पेटी बाहेर काढली. कसरत करत अगदी हळूच त्यातली पदकं तिने परागला दिली आणि ढोलीतले खडे, पानं तिने त्या पेटीत भरली. पानांच्या आडोशामुळे कोणालाच काही कळले नाही. पराग मात्र मोठ्याने बोलत होता.''सावकाश थरथरू नकोस. तू फक्त बघ काय मिळतं आहे ते. सावकाश. हं दे ती पेटी, रडू नकोस.''

दोघेही खाली उतरल्यावर सलिलने ती पेटी हिसकावूनच घेतली. पेटी त्याच्याकडे असल्याचे बघून पीटर लगेच म्हणाला,''I Will do one thing मी माझ्या टॉमीला ह्यांच्या पाळतीवर बसवतो. आपण रूमवर जाऊन ठरवू पुढे काय करायचं ते.'' ''ठीक आहे असंच करू.'' सलिल पटकन तयार झाला. ''टॉमी, टॉमी. Sit here. Don't allow anybody to go. Guard them whle night, till i shall come back. Guard them whole night. Ok."

टॉमीने आज्ञाधारकपणे मान हलविली आणि जोरात भुंकला. ''तुम्ही इथे गोल करून बसा.'' सलिलने त्यांना सांगितले. सगळे गोल करून बसल्यावर दोघंजण पेटी घेऊन निघून गेले.

''रात्रभर इथे राहाण्याच्या कल्पनेने मला खूप भीती वाटते आहे रे.'' रश्मी इकडे तिकडे बघत म्हणाली. ''आपण थोडं जरी हललो तरी हा अल्सेशियन कुत्रा आपल्याला फाडून खाईल.'' सौमित्र म्हणाला.''छे ! एवढं करून घरी आपल्यालाच ओरडणार.'' रूपालीला जणू रागावलेले आई-बाबा समोर दिसत होते. पण दुसरा काहीच मार्ग नसल्यामुळे सगळेजण चूपचाप बसून राहिले. तासभराने त्यांना दूरवर सायकलची घंटी ऐकू आली. त्याबरोबरच टॉमी जोरात भुंकला. आता काय नवीन संकट येणार आहे, अशा भीतीने विवेक आणि रूपाली एकदम ताठरले. पण पाचच मिनिटांनी तन्मयची हाक ऐकू आली, ''चिन्मय दादाऽऽ, पराग दादा, कुठे आहात तुम्ही?'' ती हाक ऐकून चिन्मयला अगदी भरून आलं आणि तो पटकन उभा राहिला. पण लगेचच टॉमी त्याच्या अंगावर गुरकावला. म्हणून त्याला खाली ओढत सौमित्रचं ओरडला, ''तन्मयऽ, पुढे येऊ नकोस तेथूनच ऐक.'' '' का ? मला तुम्ही दिसत नाही आहात.'' तन्मयने विचारले. ''इथे एक अल्सेशियन कुत्रा आमच्यावर पहारा करतो आहे. म्हणून तू पुढे येऊ नकोस. नीट लक्षपूर्वक ऐक. लगेच घरी जाऊन परागच्या बाबांना आणि पोलिसांनाही फोन कर की आम्ही संकटात आहोत, लगेच या. सौमित्रच्या काकांना पण सांग. लवकर जा. आणि काळजी घे.'' चिन्मयने भराभर त्याला सूचना दिल्या.

**दूर कुठूनसा आला घंटारव कानी । मंत्र मुग्ध माझी वृत्ती, मुके मन, मुकी वाणी ।**

''ठीक आहे. मी लगेच जातो. तुम्हीपण सांभाळा.'' असं म्हणून तन्मय परत वळला. ''खरंच तन्मय देवासारखा धावून आला. आपण त्यालाही आता आपल्या ग्रुपमध्ये घेऊ. एवढ्या रात्री एकटा आला आपल्याला शोधायला म्हणजे ग्रेटच आहे तो.'' रूपाली आनंदून म्हणाली. अर्ध्या तासातच पोलिसांच्या गाडीचा हॉर्न वाजला. याचा अर्थ तन्मयने आपले काम चोख बजावले होते. पण त्या आवाजाने टॉमी जोरजोरात भुंकायला लागला. मुलं नजरेच्या टप्प्यात आल्यावर काकांनी गाडी थांबवली. जिगरला घेऊन ते खाली उतरले. ते स्वत: एक उत्तम Dog Trainer होते. त्यामुळे त्यांनी एक विशिष्ट आवाज करून टॉमीच्या दिशेने पाऊल टाकले. ''Good boy Tommy. Relax. जिगर, जा त्याला घेऊन ये.'' त्यांच्या आज्ञेबरोबर जिगर उडी मारून टॉमीच्या मागे उभा राहिला. थोडावेळ त्यांच्या गुरकावण्यामुळे आख्खी बाग दणाणली आणि मग टॉमी शेपटी हलवत इन्स्पेक्टरकाकांकडे आला. त्यांनी त्याला थोपटले आणि मायेने म्हटले, ''Good boy, sit down'' त्या दोन्ही कुत्र्यांना जीपमध्ये ठेवल्यावर काका मुलांकडे वळले आणि म्हणाले, ''हा काय प्रकार आहे? हा कुत्रा कोणी तुमच्या पाळतीवर बसवला?'' ते शांत वाटत होते, पण

खरंतर त्यांचा राग अनावर होत होता.

''काका आम्ही क्षमा मागतो. पण आत्ता आधी आपण भाऊसाहेब पवार इंजिनिअरींग कॉलेजच्या हॉस्टेलवर जाऊया. मी जीपमध्ये बसल्यावर तुम्हाला सगळं सांगतो.'' सौमित्र जीपमध्ये बसत म्हणाला. ''हो, लवकर जाऊया कारण आत्तापर्यंत त्यांना पेटीतले खडे सापडले असतील.'' पराग म्हणाला आणि सगळेच बुचकळ्यात पडले.

''आता नीट स्पष्ट सांगाल का?'' काका जवळ जवळ ओरडलेच. ''झश्रश्रशरीश काका आधी हॉस्टेलवर जाऊया.'' पराग विनवून म्हणाला. एकदाची जीप चालू झाल्यावर परागने नीट सविस्तर सगळी घटना सांगितली. शेवटी ती पदकेही दाखविली. त्याचं सांगून होईपर्यंत सगळे हॉस्टेलवर आले. अपेक्षेप्रमाणे दोघेही पीटरच्या खोलीवर होते. पेटीतले खडे पाहून दोघेही एकमेकांवर संशय घेऊन भांडत होते. त्यांना काही समजायच्या आत पोलिसांनी त्यांना पकडून बाहेर काढले. सलिल गयावया करून सांगायला लागला की तो पदके परत करणारच होता. पण त्याच्याकडे कोणीही लक्ष दिलं नाही. शेवटी काका त्यांना म्हणाले ''पोरांनो, तुम्ही खूपच मोलाची कामगिरी केली आहे. त्याबद्दल तुमचं कौतुक करावं तेवढं थोडं आहे. पण असं वेडं धाडस पुन्हा करू नका. चला आता मी सगळ्यांना घरी सोडतो.''

घरी गेल्यावर सगळ्यांच्या घरच्यांना मोठा धक्काच बसला. आणि तन्मयनेही आपण फक्त झोपेचे नाटक केले, असे सांगून अजूनच बॉम्ब टाकला. पण शेवटी तो प्रसंगावधान दाखवून आला म्हणूनच सगळेजण सुखरूप राहिले.

रात्रभर न झोपता घरी सगळी कहाणी सांगून झाल्यावर, भल्या पहाटे सगळी पोरं आनंदकाकांच्या घरी गेली. एवढ्या पहाटे त्यांना पाहून काकांना खूपच आश्चर्य वाटलं. चिन्मयने तत्परतेने त्यांना पदके दिली. ते पाहून काकांच्या तोंडून शब्दच निघेना. ''खरंच पोरा, तू तुझा शब्द खरा केलास.'' त्यांनी चिन्मयला जवळ घेतलं.

भावनावेग ओसरल्यावर पोरांनी त्यांना रात्रीची गोष्ट सांगितली. ते ऐकून काका थक्कच झाले. ''आता तुम्हाला नक्कीच बक्षीस दिलं पाहिजे.'' काका म्हणाले.

''हो, पण आमचं बक्षीस वेगळं आहे काका. आम्हाला रोज इथे आमच्या मंडळाची सभा घ्यायला परवानगी द्या आणि रोज एक नवीन गोष्ट सांगा.'' परागने असं सांगितल्यावर सगळेच खूष झाले. परागने एक नवीन घोषणाही लगेचच केली. ''आता आपल्या मंडळाचा तन्मयही सभासद आहे. कारण त्याच्या शौर्यामुळेच आपण यशस्वी झालो आहोत. तेव्हा आपल्या मंडळाचे नाव ठेऊया 'अभिनव मित्रमंडळ'; कारण आपली पहिलीच कामगिरी फार अभिनव पद्धतीने पूर्ण झाली आहे आणि पुढची कामगिरी मिळेपर्यंत......

आणि साहसी आनंदकाकांच्या घरी अभिनव मित्रमंडळाची आणि पुढच्या अनेक साहसांची मुहुर्तमेढ नकळत रोवली गेली. (समाप्त)

***

**– सौ. नीता जोशी.**
१५बी/५,पश्चिमानगरी,
कर्वेनगर, पुणे–५२.

**फुलतात वल्लरी रानजाईच्या तिथे । दरवळे गंध त्यामुळे भान हरपते ।**

# पोलिस काल–आज आणि उद्या

गेल्या वर्षीच्या अनंत चतुर्दशीच्या मिरवणुकीतील प्रसंग ! मिरवणुकीत माणसांचा जणू सागरच उसळला होता. मुंगीच्या गतीने विसर्जनाचे गणपती पुढे सरकत होते. गुलालाची उधळण आणि वाद्यांचा गजर, प्रदूषणात भर टाकत होते. नेत्रदीपक रोषणाई आणि ट्रकवरील विविध देखावे बघण्यासाठी अक्षरश: आबालवृद्धांची चेंगराचेंगरी चालली होती. गर्दीचे नियंत्रण करण्यासाठी पोलिसांनी साखळी केली होती. इतक्यात् चोर चोर ! पकडा पकडा ! असा ओरडा झाला. कडेवर बाळ असलेल्या एका महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरट्याने हिसकावले होते. परंतु तो चोरटा पोलिसांनी लगेच पकडला आणि त्याची रवानगी पोलिस चौकीत झाली. ही गडबड शांत होते न होते तोच क्षुल्लक कारणावरून गर्दीतील दोन गटात मारामारी सुरू झाली. समाजकंटकांना, दंगे–धोपे करणाऱ्या गुंडांना ही पर्वणीच असते. सगळ्या मिरवणुकीचा नूरच पालटला. उगाचच धावाऽ धावाऽ असा ओरडा काही गुंडांनी सुरू केला. लोक घाबरून पळू लागले. लहान पोरेटोरे किंचाळू लागली. बायकांनी जवळच्या इमारतींचा आश्रय घेतला पण पोलिसांनी कुशलपणे सर्व परिस्थिती हाताळून, वेळप्रसंगी सौम्यसा लाठीमार करून परिस्थिती काबूत आणली. मिरवणूकीची शिस्त नियंत्रित करून, पोलिसांनी लाऊडस्पीकरवरून लोकांना न घाबरण्याचे आवाहन केले. अर्धा तासाच्या गोंधळानंतर पुन्हा मिरवणूक व्यवस्थित सुरू झाली. काही दंगेखोर पकडलेही गेले. सर्व पोलिस चोवीस तासांपेक्षा जास्त वेळ विश्रांती न घेता ड्यूटीवर होते. पण तरीही त्यांची लाठीमार करण्यातली अपरिहार्यता लोकांनी समजून घेतली नाही. शेवटी पोलीसपण तुमच्या आमच्यासारखी माणसेच आहेत. समाजातील त्यांची भूमिका महत्त्वाची आहे. पण समाज म्हणजे तरी काय ?

अनेक कुटुंबे एकत्र येऊन समाज बनतो. वेगवेगळे समाज एकत्र आल्यामुळे राष्ट्र तयार होते. कुटुंब

असो,समाज असो अथवा राष्ट्र असो; तेथे अंर्तगत सुव्यवस्था आणि एकोपा

नांदणे आवश्यक असते. अन्यथा बाहेरच्या शक्तीचे आक्रमण प्रभावी ठरते.

कुटुंबात ज्याप्रमाणे एखाद्या वडिलधाऱ्या व्यक्तीचे काम सर्वांवर नियंत्रण ठेवण्याचे असते; त्याचप्रमाणे समाजात आणि राष्ट्रातही हे काम कोणी तरी करावे लागते. समाजात आपसातील वाद सोडविण्यासाठी न्याययंत्रणा जरी अस्तित्वात असली तरी गोंधळाच्या ठिकाणी वेळेवर हस्तक्षेप करून शांतता निर्माण करण्याच्या कामाची जबाबदारी, पोलिसांवर टाकण्यात आलेली आहे. अशाप्रकारे अंतर्गत अशांततेचे वातावरण कोणत्याही वेळी व कोणत्याही ठिकाणी होण्याची शक्यता असल्याने, पोलिसांचे काम आपले रात्रंदिवस चालू असते. देशातील शासक वेगवेगळ्या यंत्रणेमार्फत आपले काम करीत असतात. तरी अशा



**पोलिस काल...**

कार्यालयाची कामे ठराविक दिवशी आणि वेळी संपतात. पोलिसांना मात्र सुट्टी आणि कामाची वेळ याचा विचार करता येत नाही. कारण गुंड, गुन्हेगार आणि समाज विघातक कारवायांशी संबंधित व्यक्ती संधीची वाट बघत असतात. त्यामुळे सातत्याने सतर्क राहून शांतता रक्षणाचे काम करावयाची अवघड जबाबदारी पोलिसांना सांभाळावी लागते.

पूर्वीपासून या कामासाठी त्या–त्या शासनाने योजना केलेली होती. मोगल साम्राज्यात आणि छत्रपतींच्या व पेशव्यांच्या काळात 'शहर कोतवाल' होते. त्यानंतर ब्रिटीशांनी प्रथम मुंबईमध्ये सुमारे २४० वर्षांपूर्वी स्थानिक लोकांच्या मदतीने पोलिस दल स्थापन केले. त्यास पुढे मुंबई पोलिस दलाचा दर्जा प्राप्त झाला आणि या मुंबई पोलिस दलाने आपल्या कामातील नैपुण्यामुळे आणि उत्कृष्ट तपासयंत्रणेमुळे ब्रिटनमधील स्कॉटलंड यार्डच्या जोडीचे स्थान मिळविले. आपल्या राज्यातील पोलिस दलसुद्धा याच परंपरेचा

वारसा जपण्यासाठी काम करीत आहे.

कालानुरूप पोलिस दलामध्ये आणि त्यांच्या कामगिरीमध्ये बदल झालेले आहेत. स्वांतत्र्यपूर्व काळात, ब्रिटीश राजवटीत पोलिस जरी या देशातील आणि समाजातील असले

**पवित्र मज यंत्राची धडधड,समाज हृदयातील हे ठोके । पवित्र मजला सत्यासाठी,धडपडणारे स्वतंत्र डोके।।**

तरी त्यांनी त्यावेळच्या राजसत्तेशी प्रामाणिक राहून आपली कामगिरी बजावली. त्यांच्या मनातील भावना जरी या मातीशी इमान राखणारी असली तरी त्यांनी आपल्या गणवेशाशी प्रामाणिक राहून आपली कामगिरी बजावली आणि स्वातंत्र्य लढ्याच्या दरम्यान अतिशय अवघड परिस्थितीत शांतता रक्षणाचे काम केले. त्यानंतर स्वातंत्र्य मिळाले. नंतर त्याच पोलिसांची कामगिरी बदलून लोकशाही संरक्षक अशी झाली. अर्थातच समाजात शांतता आणि सुव्यवस्था ठेवणे, हे प्राथमिक कर्तव्य कालही होते, आजही आहे आणि उद्याही राहाणार आहे.

अशाप्रकारे पूर्वी केवळ गुन्हेगाराचा शोध घेणाऱ्या पोलिसांना, त्यांचे हे प्राथमिक कर्तव्य पार पाडण्यासाठी पुरेसा वेळ देता येत नाही. समाजाच्या अपेक्षा सतत वाढण्याचे कारण असे की पोलिसांजवळ गणवेश आणि शासन अशा दुहेरी शस्त्राचा उपयोग करण्याची क्षमता असल्यामुळे, प्रत्येकास पोलिसांनी आपल्या कामासाठी कायदा वापरावा असे वाटते. परंतु कायद्यानेसुद्धा पोलिसांच्या कक्षा ठरवून दिलेल्या आहेत. पोलिसांचे उतरदायीत्व विचारात घेता. त्यांना आपल्या कक्षा सोडता येत नाहीत. विशेषत: दिवाणी स्वरूपाच्या आणि इतर मालमत्ताविषयक बाबींमध्ये जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यात पोलिसांना वाव नसल्यामुळे, किंबहुना तशी कायदेशीर तरतूद नसल्यामुळे असे प्रश्न घेऊन येणाऱ्या व्यक्ती निराश होतात. त्याचप्रमाणे कायद्याने केवळ दखलपात्र गुह्यामध्येच कारवाई करण्याचे अधिकार पोलिसांना दिले असल्यामुळे अनेक किरकोळ स्वरूपाचे गुन्हे करणारे गुन्हेगार मोकळे राहतात आणि संबंधित तक्रारदाराच्या मनात पोलिसांबद्दल नाकर्तेपणाची भावना निर्माण होते. कायद्याच्या अज्ञानामुळे पोलिसांनी आपल्या तक्रारीबद्दल न्याय दिला नाही, अशीही भावना निर्माण होते. काही गुह्यांच्या संदर्भात जामीनाच्या आधारे तात्पुरती सुटका होण्याची तरतूद कायद्यात असल्याने पोलिस काहीही करू शकत नाहीत आणि प्रसंगी गुन्हेगार सुटू शकतो. अशा परिस्थितीत तक्रारदार, पोलिसांकडून आपणास न्याय मिळाला नाही, अशा निष्कर्षाप्रत येईल हे स्वाभाविक आहे. परंतु एक गोष्ट नक्की, पोलिसांच्या शक्तीचा वापर करून काही प्रमाणात तक्रारदारांच्या अडचणीचे निवारण होऊ शकते, इतकेच नव्हे तर वेळी अवेळी सर्व बाजूंनी निर्माण झालेल्या संकटाच्या क्षणी सामान्य माणसास पोलिस हाच त्याचा पाठीराखा आणि मदत करणारा असल्याची भावना असते. या भावनेस तडा जाणार नाही असा पोलिसांचा प्रयत्न असतो. परंतु त्यांच्या या कामामध्ये अनेक दोषही दिसून येतात. विशेषत: नेहमी तेच काम करणाऱ्या पोलिसांची नजर बोथट होऊन त्याला तक्रारदाराच्या दुखा:चे व संकटाचे गांभीर्य लक्षात येत नाही. तक्रारदाराला दिलासा देईल, असे वर्तनसुद्धा त्यास समाधानाचा क्षण देवून जाते. अशाप्रकारे आवश्यक सेवा सदरातील पोलिसांची कामे सामान्य माणसांसाठी केवळ देवदूताची असतात यात शंका नाही. नैसर्गिक आपत्तीच्या वेळी अर्थात भूकंप, महापूर, वादळे, गंभीर रेल्वेअपघात याप्रसंगी पोलिसांकडून मिळणारी मदत केवळ सामाजिक जाणीव ठेवून असली तर त्याचा फारच चांगला परिणाम दिसून येतो. याशिवाय दैनंदिन जीवनात अपघात, किरकोळ वाद, लोकशाहीतील निदर्शने, गर्दीचे नियंत्रण, वाहतूक समस्या आणि महत्त्वाच्या व्यक्तींची सुरक्षा, अशा अनेकविध कामाच्या पार्श्वभूमीवर पोलिस सामान्य माणसाच्या तक्रारीवर न्याय देण्याच्या प्रयत्नात असतात. अर्थात त्यामधील बंधने पोलिसांची मानसिकता आणि प्राधान्यक्रम यांचा विचार करता प्रत्येक कामास वेळेवर आणि योग्यतेप्रमाणे पार पाडणे अवघड असते.


**पोलिस आज ...**

दुर्दैवाने सध्या पोलिस खात्यामध्ये येणारा कर्मचारी वर्ग परिस्थितीचे गांभीर्य न समजणारा असतो. कनिष्ठ पोलिस कर्मचारी केवळ गरज म्हणून आणि शासकीय सेवा म्हणून नोकरीत येतो. त्यांच्यामध्ये जी सामाजिक जाणीव असावयास पाहिजे ती नसते. अधिकारी पातळीवरसुद्धा सध्या ज्या पद्धतीने काम चालते, तो स्वतंत्र चर्चेचा विषय आहे. एकंदरीत पोलिसांकडून होणारे वर्तन हा वेळोवेळी ज्याप्रकारे टिकेचा विषय होतो, त्यामुळे या खात्यात आता सामाजिक जबाबदारीची जाणीव असलेले आणि विचारी अधिकारी येत नाहीत असा अनुभव आहे. नव्या

**उजळले दिवे तरी काळोखिचा धाक । जुळवल्या दुव्यांचीही असे आणभाक ।।**

पिढीकडे या दृष्टिने मोठी जबाबदारी येते. त्यांनी वैद्यकीय क्षेत्राप्रमाणेच पोलिसांचे कार्यक्षेत्र सामान्य माणसांच्या सेवेचे आणि सामान्य माणसाचे दु:ख दूर करण्याचे साधन समजून, हे आव्हान स्वीकारले तरच भविष्यात पोलिसांची कामगिरी अधिक परिणामकारक होऊ शकेल. अन्यत: ज्या समाज विघातक शक्ती आता कायद्याच्या त्रुटीचा फायदा घेऊन पोलिस दलाचे आदेश झुगारून, समाजात गोंधळ घालतात, त्यांना आयतेच रान मोकळे सापडेल. सत्यशक्ती आणि दुष्टशक्ती यांचा संघर्ष हजारो वर्षांपासून चालू आहे आणि यापुढेही चालणार आहे. दुर्दैवाने आज लोकशाहीमध्ये समाजाच्या खालच्या थरापासून वरपर्यंन्त, असामाजिक तत्त्वे आपले उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी कोणत्याही गैरमार्गाचा अवलंब करणेस मागेपुढे पाहात नाही. त्यांच्यावर नैतिकतेचे बंधन ठेवणे अशक्य असल्यामुळे केवळ पोलिसांसारखीच शासनसंस्था त्यांना बंधनात ठेवेल ही जाणीव ठेवून, आता या खात्यामध्ये चांगल्या विचारांच्या आणि प्रवृत्तीच्या नवीन पिढीचे आगमन अपेक्षित आहे.

मला माझ्या सुमारे ३२ वर्षे सेवाकालावधीमध्ये पोलिस खात्यात आलेले अनुभव विचारात घेता येथे उत्कृष्ट समाजकारणास चांगला वाव असण्याची खात्री वाटते. गैरव्यवहार करणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था यांच्यावर लक्ष ठेवण्याचे काम केवळ पोलिसच करतात. इतकेच नव्हेतर, त्यांना सुधारण्यासाठीसुद्धा शासनासह इतर मार्गाने प्रयत्न केले जातात. प्रामुख्याने सध्या गुन्हेगारांचा पुनर्वसनाचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. कारण जो गुन्हेगार किरकोळ गुन्हा करतो त्यास जर समाजाने स्वीकारले नाही,तर तो पुन्हा त्याच मार्गावर जाण्याची आणि समाजास उपद्रव देण्याची शक्यता असते. त्यामुळे आता तुरुंगामध्येसुद्धा त्यांची मानसिकता बदलण्यासाठी विपश्यना आणि योगसाधना अशापद्धतीचा आधार घेतला जातो. त्याचप्रमाणे व्यसनाधीन व्यक्ती त्यांच्या एका कुटुंबासच नव्हे तर संपूर्ण समाजास धोका करण्याची शक्यता असते. त्यामुळे व्यसनमुक्ती केंद्रासह तत्सम संस्थांच्या कामाशीही पोलिसांचा संबंध येतो. न स्वीकारता येणाऱ्या परिस्थितीत जन्मलेले एखादे नवजात बालक प्रथम पोलिसांच्या हाती आल्यास, त्याचा जीव वाचवून त्यास सुरक्षितपणे बालसंगोपन केंद्रात पोहोचविण्याची जबाबदारी जेव्हा पोलिस पार पाडतात, तेव्हा एक वेगळा मानसिक आनंद मिळत असतो. तसेच रस्त्यावरील जखमी इसमास विनाविलंब उपचारासाठी घेवून गेल्यावर जेव्हा तो उपचाराअंती ठीक होतो; तेव्हा त्याचे नवे जीवन केवळ पोलिसांच्या कामगिरीचे वरदान असते. एखाद्या तरुण मुलीस मार्ग चुकल्यामुळे ज्यावेळी अडचणीत यावे लागते, त्यावेळीही रेल्वे स्थानकावरील पोलिस अथवा गस्तीवरील पोलिस तिची मदत करताना त्यांच्या केवळ कर्तव्याचीच नव्हे तर सामाजिक जबाबदारीचीही जाणीव असते. शाळेत जाणारी मुले, कौटुंबिक संघर्षामुळे घराबाहेर पडलेले वृद्ध यांना मदत करताना केवळ कर्तव्यपूर्तीशिवाय इतरही जाणीव मनात असते. समाजातील अडलेल्या-नडलेल्यांना मदत करणारी पोलिस ही संस्था अधिक कार्यक्षम व्हावी असे वाटत असेल, तर सध्याच्या पोलिसांच्या कामगिरीवर टीका



**पोलिस उद्या...**

करण्यापेक्षा त्यात सुधारणा घडवून आणणारे, प्रसंगी असामाजिक तत्वाविरुद्धच्या संर्घषात आपण स्वत: सामील होणे ही काळाची गरज आहे. अन्यत: दुर्बलांच्या मदतीसाठी उभी राहणारी ही संस्था हळूहळू क्षीण होऊन अखेरीस अराजक सदृष्य परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. दुर्दैवाने सध्या लोकशाहीच्या कक्षेमध्ये अनेक नको असलेल्या व्यक्तींनाही अधिकार पदे मिळत असल्यामुळे पोलिसांचा उपयोग केवळ आपले सामाजिक हिशोब चुकते करण्यासाठी केला जातो. त्यामुळे संपूर्ण समाज व्यवस्था धोक्यात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

अशा परिस्थितीत प्रत्येक सुजाण नागरिकावर एक जबाबदारी नकळत आलेली आहे, ती म्हणजे आपणही प्रसंगी पोलिसांच्या कामात मदतच नव्हे तर, पोलिसांचेही काम करावयास पाहिजे. प्रत्येक नागरिक खाजगी वेशातील पोलिस आहेत, अशी मानसिकता जर निर्माण झाली तर समाजात अनुचित प्रकार व त्यामधून निर्माण होणारी गुन्हेगारी संपविण्यामध्ये आपण यशस्वी होऊ असा विश्वास आहे.

***

**प्रभाकर शुक्ल,** पोलिस निरीक्षक
फरासखाना पोलिस स्टेशन,पुणे

दाट काळोखाच्या पोटी मंद चमकती लाटा । काही अज्ञान भोवरे काही असंभाव्य वाटा ।।

स्वयंपाकघरात जेवणाच्या टेबलावर वह्या पुस्तकं ठेवून, अभ्यास करण्याची तंबी देऊन आई बाहेर सामान आणायला गेली होती. कॉटवर बसून रेडिओ लावून अभ्यास करण्याची खरी माझी पद्धत. पण आईने त्याला कडाडून विरोध केला. गेल्या दोन महिन्यांपासून टी.व्ही. बिघडल्याने बंदच होता. तो दुरुस्त न करता आणखी चार महिने- म्हणजे माझी परीक्षा होईपर्यंत- तसाच धूळ खात पडणार होता. टी.व्ही.नाही तर रेडिओ तरी ऐकायला मिळेल, असे वाटत होते. पण दुधाची तहान ताकावर भागविण्याचीही सोय नव्हती. कारण आई जितकी प्रेमळ तितकीच कठोरही...

स्वयंपाकघरात अभ्यास ही कल्पना काही मला रुचत नाही. समोरच डब्यांची, बरण्यांची रांग, कुठकुठल्या फोडण्यांचे वास आणि कट्ट्याजवळ खडा पहारा देणारी साक्षात् आई --- बापरे !

पण मी कॉटवर पोक काढून, मान मोडून बसलेली आईला आवडत नाही. विद्यार्थ्यांनी कसं ताठ बसलं पाहिजे, असं तिचं मत. शिवाय कॉटवर मला लगेच झोपही येते. डोळे गपागप मिटतात. सकाळ असो, दुपार असो, संध्याकाळ असो मला कधीही झोप येते. ती झोप इतकी अनावर होते, की पुस्तकातली अक्षरं गोल-गोल फिरायला लागतात. एकच ओळ १०-१२ वेळा वाचूनही डोक्यात शिरत नाही आणि पाठीमध्येही उसण भरलीये, असं वाटायला लागतं. एकंदरीत कॉटवर बसून अभ्यास करणं म्हणजे

निव्वळ अभ्यासाचं नाटक असतं नाटक!

# चला, आणि 'एकलव्य' बनूया...

**– आश्लेषा महाजन**

मी निमूटपणे भूगोलाचा अभ्यास सुरू केला. मग विचार केला, छे ! भूगोलाचा अभ्यास आता करून काय फायदा ? परीक्षेच्या आधी चार दिवस अभ्यास केला की झालं. नंतर वाटलं, रसायनशास्त्राला खूप दिवस हात लावला नाही. पण त्या कल्पनेनंच शहारा आला. रसायन माझा नावडता विषय. शेवटी भूमितीतल्या आकृत्या काढण्याचा विचार पक्का केला. कंपासबॉक्स उघडला. गुण्या काढला. पेन्सिलला टोक केलं, वही उघडली. तेवढ्यात माझी मान लचकली आयाई गं ! मला ब्रह्मांडच आठवलं. मान वाकडी करूनच मी आईच्या कप्प्यातला बाम शोधला आणि तो मानेवर चोपडला. थोडंसं बरं वाटलं. मग मी ठरवलं, आकृत्या काढण्याचं जिकीरीचं काम करण्यापेक्षा मराठीच्या कविताच पाठ कराव्यात. ठरलं तर मग... मी कविता गाऊ लागले. सगळ्या पाठच केल्या. त्यावरचे प्रश्न सोडवले. सुवाच्य अक्षरात उत्तरंही लिहिली. मान दुखत असताना अभ्यास केला. अभ्यास झाला म्हणून आई आपल्याला शाबासकी देईल, या कल्पनेनं खूप छान वाटलं. मी आईची आतुरतेनं वाट पाहू लागले.

आईचाच विचार करत होते म्हणून आईच सारखी डोळ्यांसमोर होती. असं वाटलं, आई समोरच- कट्ट्याजवळ-उभी आहे. जणू काही द्रोणाचार्य आणि मी एकलव्य ! तिच्याकडे बघून -तिच्या प्रेरणेनं आपण अभ्यास करत आहोत. वा ! काय छान कल्पना आहे ! माझी मानदुखी विसरून मी पुन्हा दप्तर उघडले. त्यातले रसायनशास्त्राचे पुस्तक उघडले व त्यातील अवघड फॉर्म्युले लिहून काढले, पाठही केले. भुरळ पडल्याप्रमाणे भूगोलाच्या पुस्तकाकडे वळले. युरोप आणि आफ्रिका खंड हिंडून आले. कट्ट्याकडे बघितलं आईरूपी गुरू



**जीवन गगनी विहरायाला हीच पंख देई । हिचा कृतिमय झरा जागता झुळझुळतो देही ।**

द्रोणाचार्य तस्सेच उभे ! मग पुन्हा इंग्रजी ग्रामरकडे लक्ष वळवलं. इतका छान अभ्यास झाला म्हणून सांगू...

खरंच ! किती छान, मोकळं आणि प्रसन्न वाटतं नाही अभ्यास केल्यावर आईचा बागुलबुवा तर नाहीसा झालाच; पण उलट अभ्यासाविषयी गोडी निर्माण झाली.

मला आठवलं, मी आईवर खूप चिडायची, तिला न जुमानता खेळत राहायची. आईची किती कटकट वाटायची आपल्याला. केवळ आई म्हणते म्हणून रडतखडत मी थोडाफार अभ्यास करत असे. पण अभ्यास म्हणजे शिक्षकांनी आणि आईने मिळून दिलेली शिक्षा वाटायची मला. हिंदीमध्ये शिक्षा म्हणजेच शिक्षण... काय मजा आहे पाहा आणि आता मला मात्र शिक्षण म्हणजेच मजा वाटू लागली. कारण मी अभ्यासावर लक्ष केंद्रित केलं, मन एकाग्र केलं, अगदी एकलव्यासारखं.

मनात विचार आला, खरंच अभ्यास झाला की आपला आत्मविश्वास किती वाढतो, किती ताजंतवानं वाटतं ! म्हणून एकलव्य होण्यात खरी मजा आहे. शाळेत मिळणारे ज्ञानघडे आपण आपल्या मेंदूमध्ये सजगपणे ओतून घ्यायला हवे. ज्ञान शिक्षकाकडून मिळालं काय किंवा पुतळ्याकडून. ते आपले आपल्यालाच आत्मसात करावे लागते. शिक्षकांना अनेक मुले घडवायची असतात. त्यांना आपल्याकडे व्यक्तिगत लक्ष द्यायला जमत नाही. पण आईला एक किंवा दोनच मुलांना घडवायचं असतं. आई संस्कारांच्या छिन्नीने आपल्यातले शिल्प घडवत असते. म्हणून एकलव्याच्या जिद्दीने आपण अभ्यास करायला हवा, याचा जणू मला साक्षात्कार झाला. होय ! आपण एकलव्य होण्यात फारसा धोका नाही. कारण आपली आई, गुरू द्रोणाचार्यांप्रमाणे आपला उजव्या हाताचा अंगठा कधीच मागणार नाही. त्याउलट अंगठा उंच करून परीक्षेला जाताना, आपल्याला अगदी मनापासून शुभेच्छाच देईल. मग आपणसुद्धा चाफेकळी आणि मधलं बोट उंचावून 'व्ही फॉर व्हिक्टरी'ची खूण करून आईला आनंद मिळवून द्यायला हवा. चला चला, आपण एकलव्य बनूया... कारण –
'एकाग्रता यशोबीजम् ।'

✻✻✻

**– आश्लेषा महाजन**
२३०, चित्ररेखा सोसा.,
सहकारनगर – १
पुणे ४११ ००९.



**समूहगान व अन्य स्पर्धा : शाळांना सुवर्णसंधी !!**


मातृमंदिर विश्वस्त संस्था निगडी, पुणे या संस्थेमार्फत माध्यमिक शाळांसाठी जिल्हा व राज्यस्तरीय (शहरी व ग्रामीण पातळीवर) विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते. यामध्ये समूहगान, मनाचे श्लोक, दहा वेगवेगळ्या रागात गाणे, अध्यापक समूहगान, पोवाडा गायन, सूर्यनमस्कार, संतवाङ्मय अभ्यास निबंधलेखन व वक्तृत्व, संपूर्ण गीता पाठांवर, या स्पर्धांचा समावेश असतो. या स्पर्धांचे परीक्षण संस्थेमार्फत प्रत्यक्ष शाळांमध्ये जाऊन केले जाते. विजेत्या शाळांना जिल्हा व राज्यस्तरीय (शहरी व ग्रामीण पातळीवर) स्वतंत्र पारितोषिके देण्यात येतात. स्पर्धेसाठी आवेदन पाठविण्याचा अंतिम दिनांक २५ आक्टोबर २००० आहे.

अधिक माहितीसाठी शाळांनी खालील पत्त्यावर संपर्क केल्यास स्पर्धांचे सविस्तर माहितीपत्रक पाठविले जाईल.

मा.कार्यवाह,
मातृमंदिर विश्वस्त संस्था, द्वारा/ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र.२५,सिंधुनगर,प्राधिकरण,निगडी,पुणे ४११००४
दूरभाष क्र. (०२०) ७६५७५०८, ७६५४३८०

**आई,तू अती कष्ट उपसले,दु:खाचे किती मूगगिळले,तेढ्या वागणुकी सहन केल्या,शब्दांचे प्रहार वर झेलले.**

# घड्याळाची गोष्ट



– मल्हार अरणकल्ले

साधं मनगटी घड्याळ घेण्यासाठी दुकानात गेलो आणि एका वेगळ्याच दुनियेत हरवून बसलो.

दुकानात भिंतींवर आणि शुभ्र काचेच्या 'शो केसेस'मध्ये किती तरी छोटी-मोठी घड्याळं टिकटिक करीत हसत होती. प्रत्येकाचे चेहरे वेगळे आणि त्यावरील हसूही निराळे. घड्याळांच्या आकारांच्या इतक्या तऱ्हा त्यापूर्वी कधीच पाहिल्या नव्हत्या. कितीही डोळे विस्फारून पाहिलं तरी ते विश्व नजरेत मुळी मावणारंही नव्हतं.

चौकोनी किंवा गोल आणि फार तर षट्कोनी आकाराची घड्याळं पाहण्याइतपतच सवय असलेली नजर कमालीची गोंधळून गेली. काय ते आकार आणि काय त्यांच्या रचनेचे वैविध्य ! काही घड्याळांत देवनागरी अंक, काहींमध्ये रोमन अंक; तर काहींत अंकच गायब; फक्त टिंबांच्या किंवा छोट्या रेषांच्या खुणा. त्यावरून अंक ओळखायचे आणि वेळ ठरवायची. वेळदर्शक म्हणून काही घड्याळांमध्ये खुणांची आणि अंकांची गर्दीच गर्दी होती. तासांचे अंक, सेकंदांच्या खुणा अशी नक्षी सगळीकडे पसरलेली होती. काही घड्याळांत इवलीशी खिडकी होती आणि तीत तारीख- वार यांचं दर्शन घडे. काहींमध्ये हे काहीच नव्हतं,; तर तिथं नुसते अंकच होते. दर सेकंदाला बदलणारे आणि पुढं पुढं धावणाऱ्या काळाची कल्पना देणारे. भारतीय प्रमाणवेळेनुसार कोणत्या देशात नेमके किती वाजले आहेत, ते दाखविणारी घड्याळंही होती. घड्याळातच हिशोब करणाऱ्या कॅल्क्युलेटरचाही समावेश होता. अंधारात चमकणारे अंक किंवा खुणा असणारी काही घड्याळंही दुकानात होती.

शालेय पाठ्यपुस्तकात भेटणारं, 'कदम खोल'च्या अवस्थेत उभं राहिलेलं आणि 'आजीच्या जवळी घड्याळ कसले आहे चमत्कारिक' या कवितेची गंमत वाढविणारं सर्वपरिचित घड्याळ तर होतंच होतं; शिवाय लंबकाचं मोहक झोके घेणारं घड्याळही भिंतीवर हसत होतं. या घड्याळांत तर इतके काही प्रकार होते की बस्स ! तासा-अर्ध्या तासाला घड्याळ ठोके देई आणि सारं वातावरण संगीतमय जादूनं भारावून जाई. अशाच काही घड्याळांत कोंबडा येऊन आरवून जाई, चिमणी येऊन चिवचिवाट करी. एका मोठ्या घड्याळात तर एक छोटा मित्र येऊन हातोड्यानं ठोके मारून जाई.

घड्याळाची निवड करताना पूर्वीपेक्षा अधिक गोंधळ वाढला. हे घेऊ की ते पाहू, अशी अवस्था होऊन गेली. एक छानपैकी घड्याळ पंसत केलं आणि दुकानदारानं प्रश्न केला, ''घड्याळाला पट्टा कुठला देऊ ?... साधा की भारी ?''

समोर पुन्हा नवा प्रश्न. थोडा धीर करून म्हटलं ''कसले कसले पट्टे आहेत ते दाखवा तरी.'' मग काय, पुन्हा ती अनोखी दुनिया पुढं उलगडत गेली. काळे-पांढरे रेशमी किंवा कातडी पट्टे आणि धातूचे घडीघडीचे पिवळे-पांढरे पट्टे यांनाच सरावलेली दृष्टी त्या अजबखान्यात गुंतून बसली. नाना प्रकार, विविध रंग आणि निरनिराळे पोत... काही विचारू नका.

**वेळेवरती गेले नाही पत्र फूल वा बोल भला । क्षण गेला तो गेला त्याची घडे न आता स्वर्णतुला ।**

इतकं सगळं पाहिलं खरं; पण शेवटी पट्टा घेतला तो साधाच, काळ्या रंगाचा- अगदी नेहमीच्या परिचयाचा.

मनगटावर घड्याळ अडकवलं. सगळ्याच नवेपणाचं सुरुवातीला खूप अप्रूप वाटतं, तसा चाळा लागून राहिला. गरज असो-नसो, घड्याळात वारंवार पाहू लागला. त्याची काच रुमालानं पुन:पुन्हा पुसत राहिलो.

आठवडाभरात घड्याळाला सरावलोही. पुढं पुढं ते बरोबर आहे की नाही, त्याची आठवणही पुसट होत गेली.

घड्याळासारखा उत्तम मित्र आपल्यापैकी जवळ जवळ प्रत्येकाच्या सदैव बरोबर असतो. तो आपल्याला अतिशय कठोरपणानं सांगत असतो, ''भल्या मित्रा, काळ धावतो आहे. पाहा,पाहा; आधीचा क्षण आता मागे पडला आहे. हा, तू अनुभवतो आहेस तो क्षणही गेला... तो फिरून येणार नाही. कालगतीचं चक्र शतकानुशतकं धावतं आहे. त्याची जाणीव आपला हा मित्र सदोदित देत आहे; पण आपण त्याच्याकडं दुर्लक्ष करतो. येणारा प्रत्येक क्षण सत्कारणी लावा, काही भलं काम करण्यासाठी तो वापरा. अभ्यास करा, संशोधन करा, कलासाधना करा किंवा सेवा करा. असं किती तरी तो आपल्याला परोपरीनं सांगत आहे ; पण ते पाहायला-ऐकायला आपल्याला वेळ आहेच कुठं?

वेळ समजण्यासाठी आपण मनगटावर घड्याळ बांधतो; पण त्याचा कालगतीचा आवाज ऐकायला मात्र आपल्याला वेळ होत नाही !

सारे अजबच नव्हे का ?

✻✻✻


**- मल्हार अरणकल्ले**
१०/२, गुरुजन सोसायटी,
शास्त्रीनगर, कोथरुड,पुणे४११०२९.




**चि. किशन काळे**
मु.पो.आडस
ता.केज, जि.-बीड




## * काय म्हणताहेत बरं मंडळी...?




**- कु.स्नेहल शेळके**
नवशांती निकेतन सोसायटी
सव्हें नं.१९३
सेक्टर नं.२९,घर नं.५६

**श्रम उद्योगांचे कल्पतरू फुलवावे । हे स्फुरण येथुनी दिशांतराला जावे ।**

# इंटरनेटवरून ‘मदतीची हाक’

अमेरिकेतल्या टेक्सास राज्यातील डेंटन या छोट्याशा गावात घडलेली घटना. १४ एप्रिल१९९७ ! सोमवारची संध्याकाळ होती ती. थंडगार वारे वाहात होते. सीन रेड्न हा १२ वर्षाचा शाळकरी मुलगा रोजच्याप्रमाणे स्कूलबसने घरी आला. त्याने पाठीवरचे दप्तर धाडकन आपल्या खोलीत टाकले आणि ‘आऽऽई’ अशा हाका मारीत तो स्वयंपाकघरात गेला. आई संध्याकाळच्या जेवणाची तयारी करत होती. सगळीकडे छान खमंग वास सुटला होता. जेवायला अजून थोडा वेळ होता. स्वयंपाकघराजवळच एका टेबलावर कॉम्प्युटर ठेवलेला होता. सीन चटकन त्याच्यासमोर जाऊन बसला.

शेरॉन आणि केनेथ या जोडप्याचा सीन हा मोठा मुलगा. तो सातवीत होता. त्याला जेनिफर नावाची बहीण होती. या जोडप्याने काटकसर करून, पैसे साठवून घरात कॉम्प्युटर घेतला होता. या मध्यमवर्गीय जोडप्याला आजच्या युगात कॉम्प्युटरचे ज्ञान किती महत्त्वाचे आहे याची कल्पना होती. शेरॉन नेहमी गंमतीने म्हणत असे की हा कॉम्प्युटर म्हणजे पोटात माहिती साठवणारा राक्षस आहे. सीन कॉम्प्युटरसमोर बसून इंटरनेट उघडून भराभर एका वेब साईटवरून दुसऱ्या वेब साईटवर जात होता. इलेक्ट्रॉनिक बीऽपचा आवाज स्वयंपाकघरात घुमत होता आणि सीनची आई, शेरॉन कौतुक भरल्या नजरेने मुलाकडे बघून हसत होती.

शेरॉनने सीनला विचारले, ‘‘काय, रे कोणता खेळ खेळतो आहेस ? पॅडवर ‘माऊस’ची जलद हालचाल करीत सीन म्हणाला, ‘मी आता बुहदा ‘टॅव्हर्न’ ला जाणार आहे. ‘टॅव्हर्न’ ही मुलांमध्ये अतिशय लोकप्रिय असलेली ‘चॅटरूम’ होती. तुमचा कसा गप्पागोष्टी करीत बसण्याचा एखादा कट्टा असतो ना ? तसंच कॉम्प्युटरवर गप्पा मारण्याचा कट्टा म्हणजे चॅटरूम. यामध्ये आपण खेळ, साहित्य, अभ्यासाचा विशिष्ट विषय वगैरे अनेक गोष्टींवर गप्पा मारू शकतो. काही वेळेस कोणताच विशिष्ट हेतू मनात न ठेवताही, सहज करमणूक म्हणूनसुद्धा गप्पागोष्टी करता येतात. या चॅटग्रुपचे आपणही सभासद होऊ शकतो.

‘टॅव्हर्न’ या चॅटरूममध्ये विज्ञानकथा आणि इतर कल्पनारम्य गोष्टींचा खजिनाच होता. ‘मीगॉश’ या नावाशी सीन ‘लॉग इन’ झाला; म्हणजे सीन व मीगॉश या दोघांच्या गप्पा सुरू झाल्या. पण लवकरच सीनला कंटाळा आला आणि तो ‘सायबरपाल’च्या आयकॉनवर क्लीक करून दुसऱ्या साईटवर गेला आणि शाळेसंबंधीच्या गप्पा करू लागला.

एव्हाना संध्याकाळचे सहा वाजायला आले हाते. इतक्यात कॉम्प्युटरच्या स्क्रीनवर नवीनच नाव उमटले, ‘‘सुसान हीक्स !’’ पाठोपाठ मोठ्या अक्षरात संदेश उमटला, ‘‘मला कोणी मदत करेल का ?’’

सीनने संदेश वाचला आणि तो पुटपुटला, ‘‘कोणीतरी नवीन खेळाडू दिसतोय. खेळाचे नियमपण माहीत नाहीत.’’ तरीपण त्याने उलट प्रश्न केला ‘‘काय झाले ? काय गडबड आहे ?’’ क्षणार्धात सुसानकडून संदेश आला ‘‘मला श्वास घेता येत नाहीये. मदत करा.’’ तरीही सीनचा चेहरा त्रासला, त्याने त्या वाक्याकडे दुर्लक्षच केले. पुन्हा संदेश आला.



ना स्पर्श, ना दिलासा, नि:शब्द फक्त ग्वाही । म्हणुनीच एकली मी ना एकली तरीही ।।

''श्वासोच्छ्‌श्वासाला त्रास होत आहे. माझ्या डाव्या बाजूची संवेदनाच नष्ट झाली आहे. मला खुर्चीवरून हलणे अशक्य झाले आहे.''

सीनने स्क्रीनचे स्कॅनिंग केले. त्याच्या लक्षात आले की बाकीचे खेळाडू या संदेशाकडे दुर्लक्षच करीत आहेत. क्षणभर त्याच्या मनात आले की खोटे संदेश पाठवून ही मुलगी आपल्याला फसवत तर नाही; पण लगेच मनात दुसरा विचार आला की ही मुलगी खरोखरच संकटात असेल तर मदत नको का करायला ? सीनने चटकन आईला हाक मारली. शेरॉनने स्क्रीनवरचा संदेश वाचला. ती म्हणाली, ''अरे सीन, ही नुसती गंमतीची फसवणूक नाही. खरंच ही मुलगी संकटात असणार.''

'सुसान हीक्स' म्हणजे एक वीस वर्षाची विद्यार्थिनी होती. तिचे खरे नाव होते तैजा. फिनलंड देशाच्या हेलसिंकी शहरातल्या कॉलेजच्या लायब्ररीत, ती रात्रीच्या वेळी अभ्यास करीत होती. हेलसिंकी शहर टेक्सासपासून अंदाजे, ११,००० कि.मी अंतरावर होते. तैजाला तिच्या भूगोलाच्या प्रोजेक्टसाठी इंटरनेटवर माहिती हवी होती. म्हणून ती रात्र असूनही काम करीत बसली होती. इतक्यात तिच्या पायाच्या घोट्यापासून तिला वेदना होऊ लागल्या. जणू काही तळपायापासून सर्व पाय गरम होत आहे, असे वाटू लागले.

अरे बापरे ! हा त्रास पुन्हा उद्‌भवला का ? असे तिच्या मनात आले. कारण हा त्रास तिला आत्तापर्यंत दोन-तीनदा झाला होता. पायापासून वेदना सुरू होत होत वर सरकायच्या आणि पाठीच्या कण्यापर्यंत पोहोचायच्या. सर्व वेदनामय भाग जणू काही उष्णतेने होरपळून निघतोय, असे वाटायचे. डॉक्टरांनासुद्धा याचे निश्चित निदान करता आले नव्हते. आत्तासुद्धा सर्व त्रास असाच झाला. नेहमीपेक्षा थोडा जास्तच. बरगड्यांपर्यंत वेदना वर सरकल्या आणि श्वासोच्छ्‌वासाला त्रास होऊ लागला. खुर्चीवरून उठणे वा हालचाल करणे अशक्य झाले. वेदनामय भागातून जणू विजेचा प्रवाह वाहतोय, असे तैजाला वाटू लागले.

लायब्ररीचा हा तिसरा मजला शांत होता. तैजाला कल्पना होती की या मजल्यावर ती एकटीच काम करत बसली आहे. फोन लायब्ररीच्या बाहेरच्या कॉरिडॉरमध्ये होता. तिथपर्यंत पोहोचायचं तरी कसं ? तिथपर्यंत खुरडत, सरकत जाता येईल का ? पण छे ! हे अंतरसुद्धा खूप होते. मग तिच्या मनात आलं, इंटरनेटवरून मदत मागता येईल का? पण कशी मागणार ? तिला इंग्रजी थोडंफारच येत होतं. 'टॅव्हर्न' खेळात ती कधी कधी इंग्रजी भाषेचा वापर करायची. त्याप्रमाणे आपले 'वेब नेम' टाईप करून ती 'लॉग इन' झाली आणि संदेश देऊ लागली.

परंतु एकंदर तिचे इंग्रजीचे ज्ञान पाहून सीनला वाटले की ही कोणीतरी लहान मुलगी तर नव्हे ? म्हणून त्याने तिचे वय विचारले. संदेश आला ''मी २० वर्षाची आहे.'' ''तू कुठे आहेस?'' असे सीनने विचारल्यावर संदेश आला,''मी फिनलंडमध्ये आहे.''

तैजाची डावी बाजू बधिर होत चालली होती. पण ती प्रश्न वाचू शकत होती. क्षणभर तिला भीती वाटली की ती देत असलेला संदेश म्हणजे खेळाचाच एक भाग आहे, असे वाचणाऱ्याला तर वाटणार नाही. प्रयत्नपूर्वक तिने पुन्हा टाईप केले. ''मी संकटात आहे मदत करा.'' आता शेरॉनला घटनेचे गांभीर्य जाणवले. ती म्हणाली,''मी आमच्या शेरीफला मदत मागू का ?''

डेंटन गावच्या शेरीफची जनसंपर्क अधिकारी होती 'एमी'. शेरॉनने तिच्याशी संपर्क साधून सांगितले की माझा मुलगा सीन हा कॉम्प्युटरच्या 'चॅटरूम' मध्ये असताना, संदेश आला आहे की एक मुलगी नीट श्वासोच्छ्‌वास करू शकत नाहीये. तिला मदत हवी आहे. एमीला वाटले हार्टअ‍ॅटॅकचा रुग्ण असेल. अ‍ॅब्युलन्सचा नंबर शोधत ती म्हणाली, ''पेशंटचा पत्ता काय ?''

शेरॉन म्हणाली, ''फिनलंड''

''अरे देवा !'' एमी म्हणाली. पण ती लगचे म्हणाली '' मी सर्वतोपरी प्रयत्न करते.''

इकडे सीन तैजाला वरचेवर तिचा फोन नंबर विचारत होती. पण स्क्रिनवर तैजाचा नंबर येतच नव्हता. बऱ्याच वेळाने फोन नंबर उमटला व संदेश आला, ''मला ग्लानी येत आहे''. सीनने टाईप केले, ''जागी राहण्याचा प्रयत्न कर. आम्ही मदत पाठवण्याच्या प्रयत्नात आहोत.'' मधे काही वेळ तसाच गेला आणि स्क्रीनवर अक्षरे उमटली, ''माझ्या वेदना वाढतच चालल्या आहेत.'' एमीने स्थानिक टेलिफोन ऑपरेटरशी संपर्क साधून सांगितले की आमच्याकडे इंटनेटवर वैद्यकीय मदतीची मागणी करणारा एक

**बाग रंग पालटते, प्रहरागणिक बदलते । खिडकीभर आभाळ मात्र आश्वासक संगत देते ।।**

संदेश आला आहे. हा संदेश हजार मैलांवरून, हेलसिंकी या फिनलंडच्या राजधानीतून आहे. ऑपरेटरला प्रथम वाटले की कोणीतरी तिची चेष्टाच करीत आहे. एमीने अनेक ऑपरेटर्सशी संपर्क साधला. तेव्हा १०मिनिटांनी तिला फोनवरून हेलसिंकीच्या टेलिफोन ऑपरेटरशी जोडून देण्यात आले. एमीने विनंती केली की तैजा या मुलीला तातडीने वैद्यकीय मदतीची जरूरी आहे. आम्हांला लगोलग तिची खुशाली कळवा. ऑपरेटरने कळवले, ''काळजी करू नका. तुम्ही दिलेल्या नंबरचा पूर्ण पत्ता काढून तिथे ॲम्ब्युलन्स व 'तातडीची रुग्णसेवा' पथक पाठवले आहे.



आता कुठे सीन, शेरॉन, एमी यांनी जरासा निश्वास टाकला.

इकडे तैजाला बाहेरच्या कॉरिडॉरमध्ये हलक्या आवाजात बोलण्याचा व पावलांचा आवाजही जाणवला. तिने हाका मारण्याचा प्रयत्न करण्यापूर्वीच ते लोक तिथून निघून गेल्याचे तिला जाणवले. त्यांच्या डोळ्यांना ती दिसलीच नव्हती. क्षणभर तिचे अवसान गळाले. पण मोठ्या कष्टाने तिने संदेश टाईप केला, ''मला पायांचा आवाज ऐकू येतोय. पण ते लोक तसेच निघूत जात आहेत.''

तैजाला उत्तर मिळाले,''घाबरू नकोस. तुला नक्कीच ते शोधून काढतील. तू लायब्ररीतच आहेस असे त्यांना सांगण्यात आले आहे.'' तैजा हे वाचत होती तोच तिला बॅटरीचा प्रकाशझोत कॉरिडॉरमधून आतल्या लायब्ररीत येत आहे, असे जाणवले. स्प्रिंगचा दरवाजा उघडला गेला आणि आतमध्ये तीन पोलिस व ॲम्ब्युलन्सबरोबर आलेली सहाय्यक मंडळी आली. तेवढ्यात तैजा 'की-बोर्ड' कडे वळली आणि तिने शेवटचा संदेश दिला, ''थँक्यू ! ते इथे आले आहेत, बाय बाय !''

सीन कॉम्प्युटर समोरील खुर्चीतच होता. आई, बाबा, धाकटी बहीण सर्वांनी त्याला घेराव घातला होता. सर्वांचे चेहरे प्रफुल्लित झाले होते. ''सरतेशेवटी तिला मदत मिळाली तर! परमेश्वराची कृपा'', बाबा म्हणाले.

चार दिवसानंतर – डेंटन येथील शेरीफच्या ऑफिसमध्ये, हेलसिंकीच्या इंटरपोल ऑफिसमधून संदेश आला, ''तैजाच्या इंटरनेटवरील मित्राला शतश: धन्यवाद ! तैजा हॉस्पिटलमध्ये आहे आणि तिची प्रकृती सुधारत आहे.'' अमेरिकेच्या ॲटर्नी जनरलने एमीचा विशेष पुरस्कार देऊन गौरव केलाच; पण खरा कौतुकाचा भाग होता सीनचा. त्याच्यावर ग्रिटींग्ज-बक्षिसे यांचा वर्षावच झाला. या प्रसंगामुळे तैजाचे कुटुंबीय आणि सीन व त्याचे कुटुंबीय यांची मैत्री अधिकच दृढ झाली. तैजाची 'इंटरनेटवरून मदतीची हाक' सीनने ऐकली होती आणि त्यावर त्वरित हालचाल केल्यामुळे तैजाचे प्राण वाचले. आजपर्यंत आपण इंटरनेटचे अनेक उपयोग आहेत हे ऐकले होते. पण इंटरनेटमुळे जीव वाचविल्याची ही घटना अविस्मरणीय खरीच !

या कथेतील हीरो 'सीन' व त्याचे अन्य सहाय्यक यांना तुम्हाला भेटायचे असेल तर त्यांचा पत्ता आहे Webchart Broadcasting System Go to www.wbs.net/readersdigest.)

***

("Cry for help on internet" या रिडर्स डायजेस्टमधील कथेचा संक्षिप्त अनुवाद)

**– नीलिमा करमकर**
इ/६, 'शशिकिरण',
अशोक पथ, लॉ कॉलेज रस्ता,
पुणे ४११००४.

**घरपरतीच्या वाटेवरती पायांवाचुनी पाय ठसे । अश्रुत चाहुल येते कानी, एक हुंदका...एक हसे ।।**

# ‘छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक’ वितरण व्यवस्था

महाराष्ट्र-बेळगाव मिळून ६७ ठिकाणी यावर्षी दीपावली विशेषांकाची वितरण व्यवस्था केली आहे. या वितरण केंद्रांचे पत्ते खाली दिलेले आहेत. सभासदांनी १८ ऑक्टोबरनंतर आपला दिवाळी अंक आपल्या गावातील वितरण केंद्रावरून, हा किंवा या वर्षातील कोणताही अंक दाखवून घेऊन जावा.

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील कोणी सभासद जर जवळपासच्या वितरण केंद्रांवरून अंक घेऊन जाणार असतील तर त्यांनी १० ऑक्टोबरपूर्वी, ते कोणत्या वितरण केंद्रांवरून अंक घेऊन जाणार आहेत, ते कळवावे म्हणजे त्याप्रमाणे त्यांचा दिवाळी अंक तेथे पाठविला जाईल.

ज्या सभासदांनी रजिस्टर पोस्टाने दिवाळी अंक पाठविण्यासाठी रु.२५/- जादा भरले आहेत (भरले नसल्यास व दिवाळी अंक रजिस्टर पोस्टाने घरपोच हवा असल्यास १० ऑक्टोबरपूर्वी रु.३०/- मुख्य कार्यालयात समक्ष अथवा मनिऑर्डरने अथवा डी.डी.ने भरावेत.) त्यांना दिवाळी अंक तसे पाठविले जातील.

**याव्यतिरिक्त वितरण केंद्रे नसलेल्या गावांमध्ये यावर्षी दिवाळी अंक पोस्टाने पाठविले जाणार नाहीत.**

बहुतांशी केंद्रांवर ज्ञान प्रबोधिनीची विविध प्रकाशने, जुने दिवाळी अंक, ध्वनिफिती, इ. विक्रीसाठी उपलब्ध आहेत. ते साहित्य आपण आवर्जून पाहावे व खरेदी करावे.

दीपावली विशेषांक अधिकाधिक जणांना वेळेत व खात्रीशीर मिळावा, यासाठी केलेली ही व्यवस्था यशस्वी होण्यासाठी, सर्व सभासद सहकार्य करतील असा विश्वास वाटतो. वितरण केंद्र सांभाळणाऱ्या, व्यक्ती त्यांच्या नित्य व्यापातून वेळ काढून, स्वयंसेवी वृत्तीने हे कार्य करीत आहेत याचे भान सभासदांनी ठेवावे व कार्यकर्त्यांना सहकार्य करावे ही विनंती.

## छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक २०००-वितरण केंद्रे

- ● **वितरण केंद्र –** दिवाळी अंक वितरण.
- ❖ **नोंदणी व पुस्तक विक्री केंद्र –** दिवाळी अंक वितरण/वर्गणी स्वीकारणे/पुस्तक विक्री/शिबिर नोंदणी
- ☐ **उपक्रम केंद्र –** वरील सर्व व्यवस्था व साप्ताहिक उपक्रम राबविले जातात.

### १. मुंबई विभाग

(मुंबई विभागातील सभासदांनी खालीलप्रमाणे संबंधित केंद्रांवरून अंक घेऊन जावेत. नालासोपारा ते विरार - वसई केंद्र, दहिसर ते गोरेगाव-बोरीवली केंद्र, अंधेरी ते सांताक्रुज-विलेपार्ले केंद्र, दादर ते घाटकोपर-बांद्रा केंद्र, घाटकोपर ते ठाणे-मुलुंड केंद्र, याशिवाय अन्य ठिकाणच्या सभासदांना मुंबई विभागातील जे केंद्र सोईचे असेल तेथून अंक न्यायला हरकत नाही; तथापि त्यांनी तसे १० ऑक्टोबरपूर्वी पुण्याला कळवावे.)

● **वसई** – **सौ.मेधा हरपनकर,** सुयोग ७ अ, सोनार आळी, पापडी, वसई, जि. ठाणे ४०१२०७ ☎ ३२३११०

☐ **बोरीवली** – **१) सौ.अंजली केशव जोशी,** ४०१ रमणिक टेरेस, सुवर्णा हॉस्पिटलजवळ, कस्तूर पार्क, बोरीवली (पू.), मुंबई ४०००९२☎८९८६२५९

**२) सौ.अर्चना अशोक साठे,** ‘साठे हाऊस’, दत्तवाडा, क्रॉस रोड नं.२,बोरीवली (पू.) ☎8060241

● **विलेपार्ले** – **सौ.वसुंधरा भोसले,**त्रिमूर्ती, प्लॉट नं.३९, तेजपाल स्कीम, रोड नं.३, विलेपार्ले (पू.), मुंबई ☎8204076/8355950

● **बांद्रा** – **श्री. कमलाकर देशपांडे ,** ४७/२२६९, गांधीनगर,बांद्रा(पू.), मुंबई ☎6411085/6409978

● **मुलुंड** – **श्री.त्रिंबक जोशी,** एफ/१७, शिवदर्शन सोसा.,सेंट पायस हायस्कूलसमोर, पं.मालवीय रस्ता,मुलूंड (प.), मुंबई ☎5692260

☐ **डोंबिवली** – **१) सौ.सविता सुनिल ढोणसळे,** बी १३, कॉमेटकुंज हौ.सो., टिळकनगर शाळेजवळ, डोंबिवली (पू.) ☎454688

**२) सौ.आश्विनी मयेकर,** प्लॉट नं. आर/३२, सुदर्शननगर, गल्ली क्र.२, एम.आय.डी.सी.निवासी विभाग,डोंबिवली(पू.) ☎472838

● **कल्याण** – **श्री.डी.एस.दातार,** सितप बिल्डींग, अतुल बाग गल्ली, पहिला मजला, मुरबाड रोड, कल्याण (प.) जि. ठाणे.

❖ **बदलापूर** – **जोशी स्पोर्टस्,** आर्य-कृष्ण सोसायटी, तलाठी ऑफिसजवळ, कुळगाव, बदलापूर (पू.) जि.ठाणे. ☎694617.

### २. कोकण-गोवा-बेळगाव विभाग

☐ **रसायनी** – **सौ.शुभदा कोकीळ,** ५ अ वरद विनायक सो., राम मंदिरासमोर, पो.मोहपाडा, ता.खालापूर,जि.रायगड ४१०२०२> ☎ 51296

● **पेण** – **सौ.शुभांगी जोशी,** झिराळ आळी, जुन्या साठे पोस्टाजवळ,पेण,जि.रायगड 402107

**ग्रह ताऱ्यांचे रासनृत्य हो गगनी दिन रात । पक्ष्यापरि सृष्टिच दडे, प्रेमाच्या घरट्यात ।**

देशप्रेम आणि मातृभाषेचा करू आम्ही प्रचार, छात्र प्रबोधन देई आम्हा हाच नवा विचार..

● **पनवेल** – **श्री.सुधीर रामचंद्र काणे,** गोदरेज प्लाझा समोर, कोंडे बिल्डिंग, टिळक रोड, पनवेल, जि. रायगड. ☎7461716

☐ **नागोठणे** – **सौ.अंजली विनोद सावंत,** बी २४७, पेट्रोकेमिकल्स टाऊनशिप, ता.पेण, जि.रायगड ४०२१२५ ☎ 7052

❖ **रोहा** – **सौ.मनीषा राजन आठवले,** बाजारपेठ, रोहा, जि. रायगड ४०२१०९. ☎42239

☐ **अलिबाग** – **१) श्री.राम जोशी,** १ कृष्णविहार, समर्थनगर, पिंपळभाट, अलिबाग ४०२२०१ ☎ 25309

**२) डॉ.अरविंद केळकर,** केळकर वाडा, जोगळेकर नाका, अलिबाग ४०२२०१ ☎ 22716, 22779

● **महाड** – **श्री.ग.गो.गाडगीळ,** १७५७ काकरतळे, महाड, जि.रायगड 402301

● **चिपळूण** – **श्री.अनिल दामले,** १०, नीलकमल, मार्कंडी, चिपळूण, जि.रत्नागिरी ४१५६०५, ☎ 52762

● **दापोली** – **श्री.विष्णु सोमण,** द्वारा महाजन ब्रेव्हरेज, स्टेट बँक गल्ली, पेट्रोल पंपाजवळ, दापोली, जि.रत्नागिरी ४१५७१२ ☎82191

● **देवरुख** – **सौ.स्नेहा सदानंद बेंद्रे,** सप्तलिंगीनगर, मु.पो.साडवली, ता.संगमेश्वर (देवरुख) जि.रत्नागिरी, ☎ 41052

☐ **रत्नागिरी** – **सौ.सुजाता नलावडे,** ७९८ ब, माजगाव रोड, मारुती मंदिर, रत्नागिरी ४१५६१२ ☎22004

● **बेळगाव** – **श्रीमती नीला दि. आपटे,** मनोरमा सदन, वाडा आवार, अनगोळ, बेळगाव, कर्नाटक ५९०००७$ ☎ 480530

### ३. पश्चिम व शिक्षण महाराष्ट्र

❖ **कोल्हापूर** – **डॉ.सौ.शुभांगी कुलकर्णी,** आशीर्वाद हॉस्पिटल, बिनखांबी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर ४१६००२☎ 521534

☐ **इचलकरंजी**– **श्री.विनायक गद्रे,** वॉर्ड नं. ५, घर नं.६८अ, झेंडा चौक, इचलकरंजी, जि.कोल्हापूर ४१६११५ ☎424008

☐ **सांगली** – **१) श्री.शैलेंद्र केळकर,** ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली ४१६४१६ ☎ 331382

**२) चि.शंतनु गोरक्षनाथ इनामदार,** व्ही ११, वंदन अपार्टमेंट, चिनार हॉटेलजवळ, नेमिनाथनगर, विश्रामबाग, सांगली ☎ 301204

● **मिरज** – **श्री.प्रभाकर पोंक्षे,** व्ही ११, वंदन अपार्टमेंट, चिनार हॉटेलजवळ, नेमिनाथनगर, विश्रामबाग, सांगली ☎223672

● **विटा** – **सौ.जयंती शरणाथे,** शरणाथे क्लिनिकल लॅब.विटा, जि.सांगली ४१५३११> ☎ 72882

❖ **कराड** – **श्री.दत्तात्रय ना.कुलकर्णी,** ४५६ डी, सोमवार पेठ, पंताचा कोट, नावडीकर वाडा, कराड ४१५११० ☎22505

❖ **सातारा** – **श्री.सतीश कुलकर्णी,** प्लॉट नं.५१, सर्व्हे नं.३२०/१अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ, सातारा ☎ 50504

❖ **सोलापूर** – **ज्ञान प्रबोधिनी बाल विकास मंदिर,** डफरीन चौक, होम ग्राऊंडजवळ, सोलापूर ४१३००१ ☎ 625782

● **बार्शी** – **श्री.रा.भ.गौरकर,** अध्यापक कॉलनी, बार्शी, जि. सोलापूर ४१३४०१ ☎22501

● **पंढरपूर** – **श्रीमती डिंपल राजकुमार घाडगे,** आशिष फ्रुड प्रॉडक्ट्स, ४५८८ गाताडे प्लॉट, जुना कऱ्हाड नाका, पंढरपूर> ☎ 23350

### ४. मध्य व उत्तर महाराष्ट्र

● **अहमदनगर** –**कु.मानसी व्यंकटेश होळेहोन्नूर,**५६/२, अवधूत लेन, रासनेनगर, सावेडी, अमित बँक कॉलनीजवळ,अहमदनगर ☎423164

● **संगमनेर** – **कु.सानिली शामसुंदर जाजू,** बाजारपेठ, जगदीश मंदीराजवळ, विठोबा गल्ली, संगमनेर ☎ 25258

● **कोपरगाव** – **डॉ.अंजली फडके ,** फडके हॉस्पिटल, धरणगाव रोड, कोपरगाव, जि.अहमदनगर ४२३६०१ ☎22428/ 22049

● **प्रवरानगर** – **चि.अमित असाराम विलायते,** 'भगवती'सप्तशृंगी नगर,बाभळेश्वर दोड,लोणी खुर्द,ता.राहाता, अहमदनगर ४१३७१३☎ 73927

● **कर्जत** – **श्री.गजानन चावरे,** गवंडे गल्ली, कर्जत, जि.अहमदनगर ४१४४०२ ☎ 22912

☐ **नाशिक** – **सौ.साधना गाडगीळ,** रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म.गांधी रस्ता, नाशिक ४२२००१ ☎ 574830

● **नाशिक रोड** – **सौ.पुष्पा गवांदे,** ३ ड्युप्लेक्स, एक्सक्लुझिव्ह सोसा, शिखरेवाडी, नाशिकरोड ४२२१०१> ☎ 565900

❖ **धुळे** – **सौ.उषा पाठक,** धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे ४२४००१.

● **नंदूरबार** – **श्री.विलास पांडुरंग जोशी,** जनक आभूषणसमोर, श्रीकृष्ण बिल्डींग, ३ रा मजला, नंदूरबार ४२५४१२

● **शहादा** – **प्रा.सी.एम.चौधरी,** कमलताई हौ.सो.मोहिदातर्फे हवेली, शहादा, जि.नंदूरबार. ४२५४०९

**जीवनाचे खरे नाव आडवळणी रानवाट । असायचीच दऱ्याखोरी नि काटे घनदाट ।**

**छात्र प्रबोधन**च्या साथीने, भविष्य घडवू आपुल्या हाताने.

● **नवापूर** – **डॉ.कैलास सार्वेकर,** ५६ ब, मंगळवार पार्क, नवापूर, जि.नंदूरबार ४२५४१८ ☎ 50914

● **जळगाव** – **श्री.ज्ञानदेव नीलवर्ण,** १७ निरांजन अपार्टमेंट, एम.जे.कॉलेजसमोर, जळगाव ४२५००१ ☎ 217311

● **चोपडा** – **श्री.सुधाकर केंगे,** विवेकानंदनगर, यावल रोड, चोपडा, जि.जळगाव ☎ 20793

❖ **चाळीसगाव** – **डॉ.रेखा शाम महाजन,** दिलीप गॅस एजन्सीजवळ, स्टेशनरोड, चाळीसगाव, जि.जळगाव.> ☎ 22611/ 22462

**५. मराठवाडा**

● **औरंगाबाद** – **सौ.आश्विनी प्र.देशमुख,** प्लॉट नं.-१४४, सुशील एन-५,साऊथ सिडको, सावरकरनगर, औरंगाबाद ☎ 484632

❖ **लातूर** – **डॉ.अरुणा देवधर,** विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर ४१३५१२ ☎ 43614

❖ **परभणी** – **१) श्री.दिलीप राके ,** 'पारस' नाथनगर, परभणी ४३१४०१ ☎ 25856

**२) श्री.एस.डी.धर्माधिकारी,** 'ऋषिकेश' सी ३९, जागृती कॉलनी, बसमत रोड, परभणी.

● **सेलू** – **सौ.सुनंदा भोसकर,** 335३३५ विद्यानगर, सेलू, जि.परभणी ४४२१०४ ☎ 22519

● **नांदेड** – **सौ.वीणा राके,** परवानानगर, बँक कॉलनी, पूर्णा रोड, नांदेड ४३१६०५ ☎ 34843

❖ **धाराशिव** – **श्री.शेषाद्रि डांगे,** स्नेहसंपदा, २७/५५८ समतानगर, धाराशिव ४१३५०१> ☎ 24059

☐ **अंबाजोगाई** – **श्री.प्रसाद चिक्षे,** मधुस्मृती, केशवनगर, अंबाजोगाई, जि.बीड ४३१५१७ > ☎ 48912

**६. विदर्भ**

❖ **अकोला** – **श्री.भूषण श्रीधर बापट,** द्वारा मिहीर उद्योग केंद्र, 'केशव अर्चना' गांधी चौक, अकोला ४४४००१ ☎ 442138

● **हिवरामुरादे** – **श्री.अशोक मुरादे,** मु.हिवरा (मुरादे) पो.पिंप्री (निपाणी), ता.नांदगाव, जि.अमरावती

● **मंगरुळपीर** – **श्री.किशोर आंबेकर,** हॉटेल पापा, एस.टी.स्टँडसमोर, मंगरुळपीर, जि. वाशिम

● **नागपूर** – **सौ.नीलमा कुलकर्णी,** वृंदावन २९१, वेस्ट हायकोर्ट रोड, लक्ष्मीनगर, नागपूर ४४००२२ ☎ 237645

**७. पुणे विभाग**

☐ **पुणे शहर** – **चौकशी कक्ष, ज्ञान प्रबोधिनी,** ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ, पुणे ४११०३० ☎ 4477691/ 4478095

❖ **निगडी** – **ज्ञान प्रबोधिनी नवनगर, निगडी,** पेठ क्र. २५, निगडी, प्राधिकरण पुणे ४११०४४ ☎ 7654380

● **भोसरी** – **डॉ.सौ.संगिता बाहेती,** 'दिशा' कॉम्प्युटराईज्ड डोळ्यांचा दवाखाना, मारुती मंदिराजवळ, पी.एम.टी.,चौकामागे, भोसरी ☎7110575

● **बारामती** – **श्री.निलेश महाजन,** २, सिल्व्हर अपार्टमेंट, विजयनगर, भिगवण रस्ता, बारामती, जि.पुणे ☎ 23460

● **सासवड** – **सौ. स्नेहल श्रीकांत देशपांडे,** 'गुरुकुल' सोसायटी, सोपानदेव मार्ग, मु.पो.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे, ☎ 22139

● **लोणावळा** – **चि. राहुल मोरेश्वर विद्वांस,** 49/A ,४९/अ, यशोस्मृती, भांगरवाडी, लोणावळा, जि.पुणे ☎ 71730

● **दौंड** – **डॉ. राजेंद्र जोशी,** चैतन्य हॉस्पिटल, दौंड, जि.पुणे ☎ 62450/62496


या व्यतिरिक्त अन्यत्र वितरण केंद्रे सुरू करावयाची असल्यास १० ऑक्टोबरपूर्वी १० सभासद मिळवून त्यांचे पत्ते व वर्गणी छात्र प्रबोधन पुणे, कार्यालयात जमा करावी म्हणजे त्याही ठिकाणी वितरण केंद्र सुरू करता येईल.

**वितरण केंद्र प्रमुखांसाठी :** सर्व वितरण केंद्रांवर १७ ऑक्टोबरपूर्वी जीपने अंक पाठविले जातील. वितरण केंद्रांनी सभासदांशिवायचे जादा अंक पुस्तके, शुभेच्छापत्रे इ. ची मागणी १० ऑक्टोबरपर्यंत मुख्य कार्यालयात नोंदवावी. म्हणजे जीपबरोबर ते साहित्य पाठविता येईल. तसेच आपल्याकडील पूर्वीचे शिल्लक जादा अंक, अन्य जादाचे साहित्य जीपबरोबर परत पाठवून द्यावे.

---

**हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १ अश्विन, शके १९२२, १ सप्टेंबर २००० या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०. येथून प्रसिद्ध केले.**

ज्ञान–विज्ञान–ललित कथा यांचा उत्तम संगम, **छात्र प्रबोधन** करील समृद्ध तुमचे जीवन.



## शुभेच्छापत्रे  व आकाशकंदिलाची निर्मिती व विक्री


बाबूंची व दोऱ्यांची आकर्षक शुभेच्छापत्रे स्वत: तयार करा आणि विका. चार शुभेच्छापत्रे तयार होऊ शकतील अशी कच्च्या मालाची पाकिटे उपलब्ध आहेत. त्यामध्ये सर्व आवश्यक साहित्य, शुभेच्छापत्र कसे तयार करावे त्याची कृती, नक्षीकामाचे नमुने, शुभेच्छापर आकर्षक ओळी, पाकिटे इ. गोष्टी असतील.

किंमत रु. १०/- (पोस्टाने रु.२५/-)

पोस्टाने मागवताना कोणत्या प्रकारची शुभेच्छापत्रे हवी आहेत (दोऱ्यांची की बांबूची) ते स्पष्टपणे लिहावे.

त्याचप्रमाणे **कार्डशीटचे आकर्षक आकाशकंदिल** तयार करण्यासाठी आवश्यक साहित्य व कृती पाकिटामध्ये असेल.

किंमत रु.१५/- (पोस्टाने रु.३५/-)



१० ऑक्टोबरनंतर स्थानिक कार्यालयांमध्ये सर्व प्रकारची पाकिटे उपलब्ध !


**दिवाळीच्या सुट्टीत नवनिर्मितीचा आनंद लुटा ! विक्रीचा अनुभव मिळवा !**

---

## ज्ञान प्रबोधिनीद्वारा, दिवाळीच्या सुट्टीत मुला-मुलींसाठी ग्रामीण भागातील तंबूतील शिबिर व गिरिभ्रमण

- *डोंगरदऱ्यांमध्ये स्वच्छ, मोकळ्या वातावरणात स्वच्छंदपणे विहरायचं...*
- *सह्याद्रीच्या कुशीत निसर्गनिरीक्षणातून पक्षी-वनस्पती-नक्षत्रे यांची ओळख करून घ्यायची...*
- *मराठमोळा, रांगडा मुलूख उघड्या डोळ्यांची बघायचा, त्यांच्यातच मिसळून जायचं...*
- *मराठमोळा, रांगडा मुलूख उघड्या डोळ्यांची बघायचा, त्यांच्यातच मिसळून जायचं...*
- *ग्रामीण भागातील प्रश्नांची, तेथील संस्कृतीची ओळख करून घ्यायची, त्यावर चर्चा करायची...*
- *महाराष्ट्रभरातून आलेल्या प्रबोधकांबरोबर अन् मोठ्या ताई-दादांबरोबर छान दोस्ती करायची...*
- *विविध अडीअडचणींना सामोरं जायचं, परिस्थितीशी जुळवून घ्यायला शिकायचं...*
- *भरपूर दमायचं अन् रमायचंही! अगदी हसत खेळत, गम्मत-जम्मत करत, अनुभव अन् आत्मविश्वास मिळवायचा...*

***या सर्वांसाठी या शिबिरात अवश्य सहभागी व्हा !***



***कालावधी :*** *३१ ऑक्टोबर ते ८ नोव्हेंबर २०००*

***स्थळ :*** *पुणे जिल्ह्यातील निसर्गरम्य परिसरात*

***वयोगट :*** *इ. ८ वी ते प्रथम वर्ष पदवीपर्यंत*
*(मुला-मुलींसाठी स्वतंत्र शिबिरे)*

***शुल्क :*** ***रु.५००/-***
*(शिबिरकाळातील प्रवास-निवास-भोजन इ.सह)*

*(आर्थिक अडचण असलेल्या विद्यार्थ्यांनी मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.)*

***प्रवेशसंख्या मर्यादित ! स्थानिक अथवा मुख्य कार्यालयात शुल्क भरून नावनिश्चित करा !***

***शिबिराचे माहितीपत्रक मुख्य व स्थानिक कार्यालयांमध्ये उपलब्ध !***

***दिवाळीची सुट्टी अधिक अनुभवसमृद्ध अन् आनंदी करण्याची संधी दवडू नका !***

# स्तोत्र 'वन्दे मातरम्' ।




तेजगर्भातून आले, स्तोत्र ' वन्दे मातरम् '
शस्त्रधारी शत्रुवरती, शस्त्र ' वन्दे मातरम् '।।धृ.।।
देशभक्तीचे निखारे, दशदिशातून धुमसले
पेटला संग्राम–क्रांती, कुंड होते पेटले
गर्जता गगनास भिडला, मंत्र ' वन्दे मातरम् '।।१।।
अग्निकुंडापरी जणु हे, तरुण इथले पेटले
परकियांच्या नरडीचेही घोट त्यांनी घेतले
आहुत्या ते देत गेले, म्हणत ' वन्दे मातरम् '।।२।।
स्फूर्तिशाली गीत म्हणुनी, मातृभूमी पूजितो
तिलक भाळी मातिचा या, आदराने लावितो
घडविला इतिहास ते हे, शब्द ' वन्दे मातरम् '।।३।।
शब्द यातिल तेजगर्भी, दीप उज्ज्वल क्रांतिचे
जन्मता पोलादी बाणा, ऋण आहे या मातिचे
अंगी या रोमांच उठती, बोल ' वन्दे मातरम् '।।४।।
पेटता संग्राम आठवू, आठवू इतिहास हा
वाचताना शौर्यगाथा, थांबतो ही श्वास हा
रक्त सांडुन गर्जलो ते, गीत ' वन्दे मातरम् '।।५।।

कवी – जयंत भिडे, पुणे

**संपर्क पत्ता :** संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे ४११०३०.
☎ (०२०) ४४७७६९१, ४४७८०९५
**कार्यालयाची वेळ :** स.१० ते संध्या.७
**या अंकाची किंमत :** रु.१०/–
**वार्षिक वर्गणी :** रुपये १२५/–
**प्रकाशन दिनांक :** सौर ९ आश्विन, शके १९२२
१ ऑक्टोबर २०००